# मानुषी











सविता शेट्टी

# मानुषी

सविता शेट्टी

ई साहित्य प्रतिष्ठान

# मानुषी


## सविता वाळिंबे-शेट्टी.

एस-1/35, जय कृष्ण सुदामा सोसा.
बांगुर नगर, गोरेगाव (प),
मुंबई-400104.
मो. 9820019448
shettysavita3@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य पुस्तकांसाठी आपले नाव व गाव कळवा)

**प्रकाशन: ३१ ऑगस्ट २०२३**

©esahity Pratishthan®2023

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# सविता वाळिंबे-शेट्टी



ई-साहित्य ने माझा प्रथम कथासंग्रह 'जननी' ई-पुस्तक रूपाने प्रकाशित केला व वाचकांच्या प्रतिसादाने मला पुढील लेखनास प्रोत्साहन मिळाले. त्यानंतर मातृत्व ह्या सर्वव्यापी विषयसूत्रावरील कथासंग्रह 'मातृवेद' ईसाहित्य तर्फेच प्रकाशित झाला.

स्त्री-जीवनावर आधारित कथांचा हा तिसरा संग्रह ईसाहित्य वाचकांपुढे आणित आहे. 'मानुषी' हे केवळ देवीचे नावच नाही, तर 'एक सुंदर अंतःकरण असलेली स्त्री' असाही अर्थ होतो. अश्याच स्त्री-विषयक कथांच्या या संग्रहासाठी 'मानुषी' हे सुरेख, समर्पक शीर्षक (तसेच, मातृत्वासंबंधीच्या 'मातृवेद' चे शीर्षक) निवडण्याचे पूर्ण श्रेय ई-साहित्यचे श्री.सुनीळ सामंत यांनाच जाते.

या कथा पुस्तकरुपाने वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य ई-साहित्य प्रतिष्ठानने केले त्या बद्दल मी संपूर्ण ई-साहित्य टीमची अत्यंत आभारी आहे.


लहानपणापासूच वाचनाची खूप आवड. सर्वच मराठी वाचकांप्रमाणे मी पुलं चे साहित्य वाचत मोठी झाले. व.पु. काळे, विजया वाड, विजया राजाध्यक्ष, जयवंत दळवी, विजय तेंडुलकर, इंद्रायणी सावकार या सर्वांच्या लेखनातही खास रुचि आहे.


मनातल्या मनात गोष्टी गुंफण्याचा छंद लहानपणापासूनच होता, प्रत्यक्ष लिखाणास 1990च्या सुमारास सुरुवात केली. लहानमुलांच्या कथा, पुस्तके तसेच स्त्री-जीवनाविषयी कथा विविध मासिकांतून प्रकाशित झाल्या. हलक्या-फुलक्या विनोदी कथाही दिवाळी अंकांमधून प्रकाशित झाल्या.

'मानुषी' या ई-पुस्तकातील कथांविषयीच्या आपल्या प्रतिक्रिया व विचार जाणून घेण्यास मी उत्सुक आहे, जरूर कळवावे.

Click on the cover to open the book

आपली नम्र,
सविता वाळिंबे-शेट्टी.
मो. 9820019448
shettysavita3@gmail.com



# मानुषी

स्त्री-जीवनावर आधारित असलेल्या या कथा

त्या महत् स्त्री-शक्तीलाच

सादर समर्पण!

# कथानुक्रम

नगण्य

कलंकित

गुपित

गोष्ट एकल्या मैनेची ...

पडछाया

रोपटं

वसा जन्मभराचा ...

# नगण्य

सकाळी उठताच गौतमीने आधी आपला सेल फोन बघितला, काही मेसेज आहे का, विशेषतः सुमितकडून? पण काही नव्हतं. कुठून असणार म्हणा? अभि नाहीसा होऊन आता तीन महिन्यांहूनही अधिक काळ लोटला होता. सुरुवाती सुरुवातीला सुमित प्रत्येक घडामोडी भेटून, फोन किंवा मेसेज करून तिला कळवत राही. आता कुठल्याही दिशेने काहीही माहिती कळणे केव्हाच बंद झाले होते. तर सुमित तरी काय मेसेज करणार? गौतमी हताशपणे उठून कामाला लागली.

खरंतर काहीही करायला हातापायात शक्तीच नाही असं काहीसं झालं होतं, आताशा रोजच असं होत होतं, पण कामाला जाणे जरूरी होते, आता ऑफिसची जबाबदारीही वाढली होती. ती तयार होण्यासाठी आरश्यासमोर उभी राहिली, पुन्हा एकदा रोजच्यासारखीच नकळत आपलंच विश्लेषण करु लागली – सुंदर नसली तरी दिसायला आकर्षक होती, टापटीपीने राहात होती, नोकरी बरीशी होती, चारचौघात हसून मिसळायची लकब होती. मग का असा अचानक अभि न सांगता सवरता तिला सोडून नाहीसा झाला होता? त्याने स्वतःच तर तिला निवडली होती ना? म्हणजे त्याच्या पहिल्या बायकोपेक्षा त्याला गौतमी खरच चांगली वाटली म्हणूनच तर त्याने तिच्यापुढे लग्नाचा प्रस्ताव ठेवला होता ना? मग असे अचानक काय झाले....?

मान हलवत ती जायला निघाली, रोजच स्वतःला तेच तेच प्रश्न विचारून काय फायदा? उत्तर तर एकाही प्रश्नाचं मिळत नव्हतं. पण हे स्वतःला दिवसातून हजारवेळा बजावूनही तिचं मन पुन्हा पुन्हा त्याच भिरभिऱ्यात अडकत होतं.

जवळजवळ 3-4 वर्षांपूर्वी अभि तिच्या ऑफिसात त्याच्या कंपनीच्या कामासाठी आला होता. तशीच झालेली त्यांची ओळख हळूहळू वाढत गेली. शिकलासवरलेला, तिच्यासारखीच बरीशी नोकरी असलेला, उमद्या स्वभावाचा अभि तिला आवडला. त्यालाही ती पसंत होती ही गोष्ट लपवण्याचा त्याने कधी प्रयत्नही केला नाही. गौतमीचे वडील तिच्या लहानपणीच वारले होते; एकुलती एक गौतमी लहानपणापासूनच आईला प्रत्येक गोष्ट सांगून मन मोकळं करायची. तसंच हेही तिने मोकळेपणाने आईला सांगून टाकलं होतं.

अभिच्या घरच्यांचा तर प्रश्नच नव्हता. तो कधी आपल्या परिवाराचं नावही घ्यायला तयार नसे. पूर्वायुष्याच्या गोष्टी निघाल्या की तो फक्त चरफडच करे, “कसला परिवार! काय ती धोंड माझ्या गळयात बांधली. माझ्या आयुष्याचे तीन तेरा वाजवायला ती बायको आणि तिच्याशी लग्न लावून देणारे ते घरचेच कारणीभूत. तिला जशी घटस्फोट देऊन सोडून दिली तसच घरच्यांचही नाव टाकलं. मला कोणी नाही असंच समज तू…”

अभि सुमितबरोबर फ्लॅट शेअर करून राहात होता. गौतमीने सुरुवातीला असाच विचार केला कि आता रागात असल्याने घरच्यांना तोडून टाकल्यासारखा वागत असेल, पण हळूहळू होईल थंड, मग तिला घेऊन जाईल घरच्यांच्या भेटीला; कारण त्याशिवाय लग्न कसे?

अभिचे लग्न होऊन मोडले होते हे गौतमीच्या आईला जरासे खटकले, पण मुलगी खुश होती नि अभिमध्ये तसे न आवडण्यासारखे काही नव्हते, त्यामुळे ती ही आनंदात होती. पण तेव्हाच अचानक तिचे आजारपण उद्भवले, निदान झाले कॅन्सर. त्यानंतर तर सगळी धावपळच झाली - गौतमीला तर काय होतय काय नाही याचे भानही राहिले नव्हते. प्रत्येक दिवस जसा सामोरा येईल तसा ती त्याच्याशी सामना करत होती.

आईच्या इतक्या सा ऱ्या टेस्ट्स, कधी त्यासाठी ॲडमिटही व्हावे लागे, बायॉप्सी, डॉक्टरांच्या भेटी नि तपासण्या, केमोथेरपीची दुर्धर ट्रीटमेंट आणि त्यानंतर त्याचे दुष्परिणाम...या सर्वातून तिला तिची नोकरी सांभाळणेही आवश्यक होते. तिच्या या धडपडीसाठी तिला ऑफिसातून इन्क्रिमेन्टही देण्यात आले; तिची पैशाची निकड जाणून घेऊन ऑफिसने ही मदत केली हे समजून तिने कृतज्ञभावाने सर्व आघाड्यांवर लढत चालू ठेवली.

दोघी मायलेकी हवालदिल होऊन मनाने पूर्ण खचून गेल्या होत्या. वडिलांचं छत्र कधी लाभलंच नव्हतं आता आईचे किती दिवस राहिले या भीतीने गौतमी गळाठून गेलेली, तर आपल्यापाठी मुलीला कोण या चिंतेने आईच्या आजारपणात भरच घातली. आजारपणाची सर्व धावपळ गौतमीच करत होती पण जोडीला अभि आहे याचाच तिला आधार वाटत होता.

आई तर तिच्या पाठीच लागली कि माझ्या डोळ्यासमोर तुझं लग्न होऊ दे; तुम्ही दोघांनी ठरवलं तर आहेच आणि कोणाची वाटही पहायची नाहीये, मग करूनच घ्या म्हणजे मी निश्चिंतपणे डोळे मिटेन. अश्या भयानक आजाराच्या सावटाखाली लग्नाचे विचारही मनात येणे शक्य नव्हते. आधीच गौतमी भोवऱ्यात

सापडल्यासारखी गर्र गर्र फिरत होती, त्यामुळे अभिचं म्हणणं कि आईच्या स्थितीत जरातरी स्थैर्य येऊ दे, अश्या अवस्थेत लग्न कसं करणार, हे तिला पटत होते. तसाही लग्नाचे विचार करायला फुरसतही नव्हती, आईची तब्येत सततच वरखाली, जास्ती करून खालीच, होत होती. करता करता त्या आजारपणाने सर्वांनाच (आपल्याबरोबर) दोन-तीन वर्षे फरपटत, खेचडत नेले.

सहा महिन्यांपूर्वी शेवटी तिची आई ही झुंज हरली. गौतमीचा तर सर्व परिवारच संपून गेला होता. ही अचानक उद्भवलेली पोकळी तिला चहुबाजूंनी लपेटून घेत होती. आत्तापर्यंतचा प्रत्येक क्षण धावपळीचा होता, श्वास घ्यायलाही उसंत नव्हती आणि आता अचानक – सगळं काही निःस्तब्ध. तिला घुसमटल्यासारखं होत होतं, जीव घाबरा होई. या सर्वातून एकच आधार होता तो अभिचा. आता हे एकलेपण फार दिवसांचं नाही, असा एक बोगद्याच्या टोकाला दिसणा ऱ्या उजेडाचा दिलासा होता.

आईची उणीव न भरून निघणारी होती. पण तिच्या लांब खेचल्या गेलेल्या आजारपणाने मनाची काहीशी तयारीही झाली होती. लग्न लवकर करण्याचा प्रश्नच नव्हता, पण निदान काही महिन्यांनी हा जीवघेणा एकलेपणा संपणार हा विचार जगण्याची आशा देत होता.

आणि मग अचानक अभि बेपत्ता झाला. एकामागून एक या अश्या गोष्टी का घडत होत्या, तिच्या जीवाचा तर थरकाप झाला. तिचे असे जे कोणी होते त्यांच्यावर अशी संकटे येत होती… त्याच्या जीवाचं काही बरंवाईट झालं, का त्याच्या बाईकला अपघात झाला…? गौतमीने अभिच्या रुम-पार्टनर सुमितसह सारं शहर पालथं

घातलं, जीव मुठीत धरून सगळ्या हॉस्पिटल्सच्या मॉर्ग्समध्येही शोधलं, पोलीस चौकशी केली. वेड्यासारखी ती आणि सुमित दिवसरात्र जागोजागी शोधत राहिले.

तेव्हाच एक गोष्ट सुमितच्या ध्यानात आली. अभिचे कपडे, सर्व वस्तू त्याच्या फ्लॅटमधून गायब होत्या. पहिल्या काही दिवसांच्या गोंधळात त्याने त्यांच्या घरात नीटपणे पाहिलेच नव्हते. मग ओळख काढून त्यांने अभिच्या बँकेतही विचारपूस केली तेव्हा अभिने खात्यातली जवळजवळ सर्व रक्कम काढून घेतल्याचे कळले. म्हणजे एक गोष्ट नक्की कि अभिला अपघात किंवा काही अघटित झाले नव्हते, तर पूर्ण पूर्वयोजनेनुसार त्याने हे शहर सोडले होते. ….. आणि गौतमीलाही! पण का?

ती सुमितला अभिच्या पहिल्या पत्नीविषयी, त्यांच्या घरच्यांविषयी विचारित राहिली, की त्यांच्यामार्फत काही धागा सापडेल. पण सुमितलाही काही माहीत नव्हते. तिला याचा खरच धक्का बसला, कारण ती समजत होती की तो अभिचा जवळचा मित्र आहे; पण तसं नव्हतं, दोघे केवळ सोयीसाठी घर शेअर करून राहिले, आणि त्यातूनच मग मैत्री झाली, पण पूर्वायुष्याबद्दल सुमितलाही काही सांगितले नव्हते. त्यामुळे शोधाचा मार्गच खुंटला. तरीही दोघेही मिळून काही सुचतं का, कसा शोध घेता येईल यावर विचार करत.

असं सोडून जाण्यामागे तिला फसवण्याचा, लग्न न करण्याचा इरादा होता? पण …. त्याने तर त्यांच्या मैत्रीच्या अगदी सुरवातीच्या दिवसांपासूनच तिच्याशी लग्न करण्याची इच्छा दर्शविली होती, त्यानेच पुढाकार घेतला होता, आणि त्यानंतर कधी त्याच्या निश्चयाविषयी त्याच्या मनात शंकाही आल्याचं दर्शविलं नव्हतं. मग आता असा का निघून गेला? कोणी दुसरी तर नाही आली त्याच्या आयुष्यात? पण

तिला काहीतरी कुणकुण लागली असती, सुमितला काही अंदाज आला असता. तसं काहीच नव्हतं…

या न सुटणाऱ्या कोड्याने तिचं डोकं भणाणून जात होतं; हे तिच्या मनातले सतत फिरणारे प्रश्न तिने सुमितला विचारून पाहिले, पण त्याच्याकडेही काही उत्तर नव्हते, ना तो अभिच्या वागण्याचा सुसंगत अर्थ लावू शकत होता. पण अभिला शोधण्यात त्याने सर्वार्थाने तिची मदत तर केलीच पण स्वतः शोध घेण्यातही काही कसर बाकी नाही ठेवली. मन मोकळं करायला ना आई राहिली होती ना शरीर गुंतवून ठेवायला आईच्या आजारपणाची धावपळ. एका विचित्र पोकळीत अधांतरी अडकल्यासारखी तिची स्थिती झाली होती.

ऑफिसच्या फोनवर तिला कोणा अनोळखी स्त्रीचा फोन आला तेव्हा गौतमीला जरा आश्चर्यच वाटलं आणि जेव्हा त्या स्त्रीने भेटायची इच्छा व्यक्त केली तेव्हा तर गौतमी गोंधळलीच. “आपण…? मी ओळखलं नाही…” गौतमी चाचरत म्हणाली.

“मी..माझं नाव स्वाती,” एवढं बोलून ती स्त्री थबकली, एक क्षण गौतमीला काही कळलं नाही – कोण स्वाती? मग ती जरा चमकलीच. अभिने बोलतांना कधी हे नाव….त्याची पहिली बायको? “ओह….तुम्ही…? म्हणजे…” तिने अंदाज घेण्याचा प्रयत्न केला.

“हो…मी, म्हणजे मी अभिजितची पूर्वकालची पत्नी. त्यासंबंधात बोलायचं होतं…तुमची इच्छा असेल तर….” गौतमीने बावचळलेल्या मनःस्थितीतच आपल्या घराचा पत्ता दिला आणि शनिवारी भेटायचं ठरवून फोन ठेवला. गौतमी पार

गोंधळून गेली होती. तिला काय बोलायचं होतं? गौतमीची माहिती, फोन, कुठून मिळाला?

स्वाती शनिवार संध्याकाळी यायची होती, पण दुपारपासूनच गौतमी अस्वस्थ होऊन आतबाहेर करत राहिली, काही सुचत नव्हतं, प्रश्न तर हजार होते – का येणार होती? काय काम होतं…? अभिच्या नाहीसे होण्याशी हिचा आता काय संबंध? ती एक क्षण दचकलीच – अभि तिच्याकडेच तर परतला नव्हता ना? पण कसं शक्य आहे? तो तर सतत तिला ‘नशिबाला लागलेली पनवती, गळ्यात बांधलेली धोंड’ या आणि अश्याच शब्दात उल्लेख करी. त्याच्या बोलण्यावरून कोणी गावंढळ, कमी शिकलेली, अडाणी बाई जिच्याबद्दल त्याला तिरस्कार होता, असं चित्र तो उभं करी, मग का जाईल परतून? तिला काहीच सुचत नव्हतं…

बेल वाजताच तिने लगबगीने दार उउघडले. पण बाहेरील व्यक्तीला बघून जरा त्रासूनच म्हणाली, “माफ करा, मला आता वेळ नाहीये, मी कोणाची वाट पहात आहे…” ती तरुणी हसून म्हणाली, “मी स्वाती, भेटायचं ठरलं होतं ना..?”

“तू…तुम्ही?” गौतमी डोळे विस्फारून पहातच राहिली. ही अभिची पत्नी? गौतमीहून वर्षा-दोन वर्षांनी मोठी, सुंदर – खरंतर नजर खिळवून ठेवील अशी देखणी, उंच सडसडीत बांधा नि कमनिय देहयष्टी, बदामी रंगाचा तिच्यावर खुलून दिसणारा सलवार कमीज. तिच्या एकूण वागण्याबोलण्यातच एक प्रकारचा दृढ आत्मविश्वास होता, सफल यशस्वी स्त्रीची झलक होती. गौतमी अवाक् होऊन पहातच राहिली…

भानावर येत गौतमीने स्वातीला आत बोलावले. तेवढ्या वेळात तिच्या मनात हजार विचार झर्र झर्र सरकून गेले – अभिची पत्नी इतकी लावण्यवती आणि कर्तबगार? मग त्याने असे विचित्र चित्र का उभे केले होते? हिला घटस्फोट देण्याइतकं

हिच्यात काय कमी होतं? आणि त्यानंतर त्याने गौतमीसारखी मुलगी निवडली? हिच्यापुढे तर गौतमी सर्वच बाबतीत अगदी सर्वसाधारण होती, हे तर आरशाइतकं स्वच्छ होतं. आणि तरीही.....

"तुम्ही इतक्या गोंधळलात का?" स्वातीने किंचित हसून विचारले, "मी तर सांगून, ठरवून आले ना..."

"तसं नाही...पण...मी" गौतमीला काय बोलावं सुचेना, "मी तुम्हाला ओळखत नव्हते ना, म्हणून...."

"ओह, समजले..." ती खरं काय ते उमजून म्हणाली, "काय सांगितलं होतं अभिने, त्याची बायको काळी, लठ्ठ कोळश्याच्या पोत्यासारखी आणि अडाणी आहे? बरं, ते जाऊ दे; पण अहो जाहो नको बाई..."

"पण..तुम्हाला...तुला माझ्याबद्दल कशी माहिती...?" स्वातीच्या एकूण जबरदस्त छाप पाडणा ऱ्या व्यक्तिमत्वाने जो धक्का बसला होता त्यातून सावरत गौतमीने विचारले, "माझ्याकडे....काय काम?"

"अभिचा ज्या सोसायटीत भाड्याचा फ्लॅट आहे तिथेच माझ्या नात्यातले राहतात," स्वातीने खुलासा केला, "त्यामुळे तुझ्याबद्दलची वरवरची माहिती, तुझं ऑफिस, आईचं आजारपण वगैरे इतपत कल्पना होती. मग मध्यंतरी दोन तीन महिने ते कुटुंब इथे नव्हते, ते परतले तेव्हा अभि बेपत्ता झाल्याचं कळलं. म्हणून मी...."

"बरंच झालं, मी खरच...म्हणजे मला काहीच कल्पना नाही....कोणाला कॉन्टॅक्ट करायचं, काय....."

"अभिचे आईवडील दोघेही नावाजलेले डॉक्टर्स आहेत," स्वाती सांगू लागली, "तू शहरातल्या यशदा नर्सिंग होमचं नाव ऐकलच असशील, ते त्यांचच. अभि तीन भावातला मधला, मोठाही डॉक्टरच, आईवडिलांबरोबर नर्सिंग होम सांभाळतो…"

"ते तर प्रसिध्द हॉस्पिटल आहे," गौतमी विस्फारल्या डोळ्यांनी बोलली, "पण अभि तर घरच्यांचा उल्लेख असा करी जसे ते…."

"मला कल्पना आहे, पण त्याचं कारण त्याचा स्वतःचाच कॉम्प्लेक्स," स्वातीने खुलासा केला, "घरातले सगळेच शिक्षणाने, नावाने इतके मोठे कि तो न्यूनगंडाचा शिकार झाला. धाकटाही प्रतिथयश सीए झाला, अभि फारसा हुशार नव्हता, कुठल्याही क्षेत्रात खूप पुढे येऊ शकला नाही आणि मनात कुढत राहिला. आमच्या घरच्यांची दुरून थोडीफार ओळख होती. अभिच्या आईने मला मोठ्याची सून करून घ्यायचं ठरवलं…."

तिचं रुप पाहता ते साहाजिक होतं म्हणा, गौतमीने मनात विचार केला. "पण मोठ्याने स्वतःच आपल्या बरोबरीच्या डॉक्टर मुलीशी लग्न ठरवलं होतं. मग त्यांच्या आईने आम्हाला शब्द दिला होता म्हणून अभिसाठी मला मागणी घातली. माझ्या घरच्यांनी विचार केला कि तो जरी डॉक्टर नसला तरी घरदार, बाकी सगळं तर तेच होतं ना, चांगली नोकरीही करत होता, म्हणून हे लग्न ठरलं. पण तेव्हाही अभिच्या मनात कुठेतरी असं की मोठ्या भावाने नाही म्हंटलं म्हणून हिचं माझ्याशी लग्न झालं…"

"पण मग घटस्फोट घ्यायला काय कारण झालं…?" गौतमीला आता कुतुहल वाटू लागलं.

"सांगते. आधीच त्याच्या मनात हे किल्मिष होतं, त्यातच माझं इंटिरिअर डेकोरेशनचं काम जोमात चालू लागलं. मला ऑर्डर्स मिळत गेल्या, मग पैसा नि प्रशंसाही. त्याने तो चिडचिडा होऊ लागला. सगळेच आपल्या पुढे ही भावना आधीच होती, आता बायकोचंही नाव होतय, ती ही आपल्याला मागे टाकून प्रसिध्दी मिळवतेय हे सहन नाही करू शकला. मग एकातून एक गोष्टी वाढत गेल्या...."

म्हणजे ती एक यशस्वी स्त्री होती हा गौतमीचा प्रथमदर्शनी कयास बरोबरच होता. "पण मग या पार्श्वभूमीचा माझ्याशी काय संबंध? सर्व प्रसिध्द कुटुंबिय सोडल्यावर माझ्याशी का लग्न करायचं ठरवलं...."

स्वाती प्रथमच बोलतांना थोडी अडखळली, किंवा बोलू का नको या विचाराने गप्प राहिली. हळूहळू गौतमीच्या डोक्यात सर्व परिस्थिती उतरू लागली. "हे बघ गौतमी, मी इथे फक्त तुझा गोंधळ कमी व्हावा, काही मदत व्हावी यासाठी आले. अभिच्या घरचे सर्वच, माझ्यासकट, कसे ग्रेट आणि त्यामानाने तू केवळ सामान्य असे काही दाखवायला नक्कीच आले नाही. पण तू त्याच्या परिवारासारखी वलयांकित नाहीस, त्याच्यासारखीच नोकरीपेशा आहेस, हे एक कारण असू शकेल..."

तिचा उतरलेला चेहरा पाहून स्वाती घाईघाईने म्हणाली, 'हे त्याच्या झाकोळलेल्या विचारसरणीतून त्याने कसे पाहिले असेल तेवढेच मी सांगण्याचा प्रयत्न करतेय, तू स्वतःला अजिबात कमी लेखू नकोस .... किंवा मी इथे माझा बडेजाव मिरवायला आलेय असही समजू नकोस....प्लीज. त्याच्या कमकुवत मनाने हा विचार केला असावा की हिच्या तुलनेत आपण नेहमीच पुढे राहू...."

“मग…तसं होतं तर आता का अचानक सोडून गेला?” गौतमीने अर्धवट स्वतःशीच बोलल्यासारखे विचारले.

“त्याची तुलाच काही कल्पना असेल,” स्वातीने सुचवले, “खरंतर प्रत्येक माणसात काहीतरी खास असतच, अभितही असणारच, पण त्याने शोधण्याचा प्रयत्न नाही केला. तुझ्यात कुठेतरी काही हुशारी जाणवली असेल, ज्यामुळे पुन्हा त्याला आपल्या उच्चतेला धोका आहे असं…”

“मला नाही माहीत,” गौतमी कोरड्या स्वरात बोलली, तिला आता या विश्लेषणात रस नव्हता. पण स्वाती सोडून द्यायला तयार नव्हती, “तुझी आई आजारी होती, तिच्यासाठी तू इतके कष्ट घेत होतीस, त्यात कुठेतरी तुझ्यातली चुणूक…”

“अं? हं…हं, ते तर मलाच करायचं होतं ना….” गौतमी यांत्रिकपणे म्हणाली, “त्यासाठी ऑफीसने मला आधी इन्क्रिमेन्ट दिलं आणि घरची परिस्थिती सांभाळूनही ऑफिसचं कामही व्यवस्थित पार पाडलं म्हणून आई गेल्यानंतर मला ऑफिसच्या नव्या ब्रँचमध्ये वरच्या पोस्टचं प्रमोशन…..”

“हं, तेवढंही निमित्त त्याला पुरेसं असेल, पुन्हा इथेही आपण कमी पडतोय, थिटे पडतोय असं वाटायला…” स्वाती मान हलवित म्हणाली, “जितकं मी त्याच्याबद्दल जाणत होते तेवढं तुला सांगून तुला पडलेले पेच हलके करावेत एवढाच माझा उद्देश. त्याच्या विचित्र वागण्याचा विचार करून स्वतःला फार त्रास करून घेऊ नकोस….”

स्वाती गेल्यानंतर गौतमी कितीतरी वेळ सुन्न होऊन बसली होती. अभिने रंगवलेल्या चित्राने ती नेहमी हेच समजत राहिली की त्याच्या पहिल्या बायकोपेक्षा ती सर्वाथाने जास्त चांगली होती आणि म्हणूनच अभिने तिला निवडलं होतं. पण वस्तुस्थिती किती उलट होती....ती सर्वच बाबतीत अतिसामान्य, स्वातीपेक्षा हीन होती, हीच गोष्ट त्याला रुचली होती. तिच्यात काही गुण नसणे हाच त्याच्यासाठी तिचा मोठा गुण होता. आतून धुमसणारी वैफल्याची भावना तिला मोडून टाकेल कि काय असे तिला वाटू लागले.

ती सुन्न होऊन किती वेळ तशीच बसली होती हे तिला कळलेही नाही. स्वाती आपल्यापाठी दरवाजा ओढून गेली तो नीट लागला नसावा, कारण सुमित दार लोटून आत आला आणि जरा गोंधळून काळजीच्या स्वरात म्हणाला, “हे काय? काय झालं, बरं नाहीये? दिवाही लावला नाहीस, अंधारात बसलीयेस....”

गौतमी काही वेळ काहीच बोलली नाही, काही सुचतच नव्हतं. मग एकदम बोलू लागली, कोण ऐकतय याकडेही तिचं ध्यान नव्हतं, सगळं बोलून मन रितं केलं. “विचार करकरून इतकं विचित्र वाटतयं...” ती एक सुस्कारा टाकत म्हणाली, “मी सर्वच गोष्टीत कमी होते...आहे, फक्त नगण्य, म्हणून त्याने मला निवडलं. विचार केला तर स्वतःचाच राग येतो. त्याने माझा फक्त वापर केला, स्वतःचा अहं, स्वतःचा इगो सुखावण्यासाठी. प्रत्येक बाबतीत त्याच्यापेक्षा कमी, हीन असणारी कोणीतरी त्याला हवी होती, त्याचा न्यूनगंड/इन्फिरिऑरिटी कॉम्प्लेक्स दूर करण्यासाठी, आता त्याने तो माझ्यावर पास ऑन केला....”

“असं नको बोलूस,” सुमित मनापासून म्हणाला, “त्याने जी चूक केली तीच तू का करतेस? त्याने नकारात्मक विचार केला. आपल्याकडे काय आहे यापेक्षा काय

नाही हे शोधून त्याला का इतकं महत्त्व द्यायचं? या गोष्टींनी इतकं खचून जाण्यापेक्षा तू हे का नाही लक्षात घेत की त्याने तुला काहीही कारणासाठी निवडलं असेल पण नक्कीच तुझ्यात बरंच काही खास दिसलं, काही गुण जे तुला खूप पुढे, त्याच्याही पुढे घेऊन जातील, म्हणूनच तर तो सोडून गेला ना? म्हणजेच तू हीन, नगण्य नाहीस. वाईट का वाटून घेतेस…….”

सुमितचे शब्द तिच्या बधिरलेल्या मनात हळूहळू झिरपत गेले, मनात कुठेतरी काहीतरी नोंदलं गेलं. तिने आपली गोंधळलेली नजर उचलून त्याच्याकडे बघितलं… त्याच्या डोळ्यांतील आश्वासन तिच्या मनाला आत कुठेतरी स्पर्शून गेले.

# कलंकित

“हं आई, कशी आहेस?” देवदत्ताने नेहमीप्रमाणे गावी आईला फोन करून विचारले, “घरी सगळे कसे आहेत? अण्णा…?”

“अं? हं…मी ठीक आहे..आम्ही सगळेच …” आई थोडी अडखळत बोलल्यासारखी वाटली त्यामुळे तो जरा साशंक झाला. “का गं? काय झालं? सगळं ठीक आहे ना…”

“अं? हो … अरे, दुर्गा आली आहे घरी…” आई म्हणाली.

“अरे व्वा! दुर्गा आलीय का माहेरपणाला? जरा बोलव तर तिला फोनवर. लेक आली म्हंटल्यावर अण्णा खूष असतील ना… काय म्हणतात अण्णा?” देव हुरूपाने बोलला.

“दुर्गा? अरे ती आंघोळीला गेलीय,” आई अजूनही जरा चाचरत बोलत असल्यासारखी वाटली, “तुझे अण्णा …. जरासा रक्तदाबाचा त्रास आहे, म्हणाले डॉक्टर….”

“आई? काय झालंय अण्णांना?” देव लगेच सतर्क झाला. आई नीटसं काही सांगत नव्हती अशी त्याला शंका आली, “अण्णा हॉस्पिटलात आहेत का? जरा नीट सांग ना…”

“नाही, नाही, घरीच आहेत…” आई घाईघाईने म्हणाली, “पण थोडी विश्रांती घ्यायचा सल्ला दिलाय डॉक्टरांनी… बाकी तसं घाबरण्यासारखं काही नाही रे…” असं आई म्हणत होती खरी, पण तिच्या स्वरात ताण जाणवत होता.

फोन खाली ठेवल्यावर देवदत्त काहीसा विचारमग्न झाला. चैत्राने त्याचे संभाषणही ऐकले आणि त्याचा गंभीर चेहराही तिच्या ध्यानी आला. “काय झालं?” तिने हळू स्वरात विचारलं, “घरी सगळे ठीक आहेत ना? अण्णा…?”

“आई म्हणाली तर खरी की सगळं काही ठीक,” देव आपल्याच विचारात बोलला, “पण ती इतकी अडखळत चाचरत होती…मला काही तरी गडबड वाटतेय…दुर्गाही आलीये म्हणे, म्हणजे अण्णांना खरंच बरं नसेल, तेव्हाच तर ती आली ना? नाही तर तशी ती फारशी माहेरी येत नाही…एकदा घरी जाऊनच यावं म्हणतो मी ….”

“मी ही येते बरोबर…” चैत्रा लगेच म्हणाली.

“तू येतेस? पण मग सुयश…?” देव शोधक नजरेने तिच्याकडे पहात होता. तिच्या येण्याने जो उद्भवणार होता त्या खऱ्या प्रश्नाची वाच्यता न करता त्याने दुसरच कारण काढून विचारलं.

“सुयशलाही घेऊनच जाऊ की. नर्सरीतच तर आहे, बुडली शाळा तरी काय बिघडतयं?” मग त्याच्या मनातला प्रश्न ओळखून म्हणाली, “मी…मी काकांकडेच राहीन, अण्णांचं बी.पी. आधीच वाढलं असेल तर त्यात त्यांना अजून मनःस्ताप नको. सगळं ठीक असलं, त्यांची संमती असली, तर येईन मी घरी…”

“पणं असं…म्हणजे, तू गावात येऊनही काकांकडे राहायचं, हे जरा अजूनच विचित्र वाटेल, नाही का?” देव बोलत होता खरा, पण त्याचं चित्त थाऱ्यावर नव्हतं हे स्पष्ट दिसत होतं.

“काही वाईट दिसत नाही. त्याच घरात तर मी लहानाची मोठी झाले. काका केव्हाचे बोलावतही आहेत,” चैत्रा मग जरा ठामपणेच म्हणाली, “ते सगळे विचार सोड पाहू. तू फक्त अण्णांच्या तब्येतीचा विचार कर…”

त्या दोघांनी नुकत्याच घेतलेल्या कारनेच जायचे ठरवले, गावच्या देवस्थानाला गाडी घेऊन जाणंही झालं असतं. मुख्य म्हणजे अण्णांना शहरात मोठ्या डॉक्टरांना दाखवायला, तपासण्या करायला घेऊन जाण्यासाठी घरची गाडी सोयीची झाली असती. – पण अर्थात, आधी अण्णा त्याला समोर उभा राहू देतील का, हाच मोठा प्रश्न होता.

गाडी मुंबईबाहेर पडून गावाच्या दिशेने धावू लागली. पाच वर्षांपूर्वी त्यांनी गाव सोडतांनाच्या घटना दोघांच्याही मनात फेर धरू लागल्या. अण्णांचा खणखणीत आवाज अजूनही कानात घुमत होता.

“माझ्यापुढे हे बोलायचंही धाडस तू केलंस तरी कसं?” देवदत्तला खूप काही सांगायचं होतं; पण वडिलधाऱ्यांना उलट उत्तरे तर नाहीच, पण शक्यतो त्यांच्यापुढे कमी बोलायचे या लहानपणापासूनच्या वळणाने तो गप्पच राहिला होता. चैत्रा बाहेर पडवीतच उभी राहिली होती. ती तिथे असेल हे जाणून अण्णांचा आवाज अधिकच कठोर होऊन टीपेला चढत होता.

“अरे, आपलं कुटुंब कुठलं, काय, याचा तरी प्रथम विचार करायचास अश्या लग्नाची गोष्ट माझ्यापुढे करण्याआधी!” अण्णा गरजले होते, “अरे गावोगावाहून भाविक ज्या जागृत देवस्थानाकडे दर्शनाला येतात त्याचे प्रमुख पुजारीपण आहे आपल्या घरात.... इथे असं काहीही अपवित्र, अमंगल चालणार नाही....”

“पण अण्णा, काय अमंगल आहे?” देवदत्त न राहवून बोलला होता, “जग किती पुढे गेलंय. घटस्फोटितांचे विवाह पुन्हा होऊ नयेत का? काय चूक...”

“व्हावेत, जरूर व्हावेत अश्या बायकांचे विवाह. पण माझ्या घरात नाही.” अण्णा ठामपणे, प्रत्येक शब्दाखाली रेघ ओढत बोलले, “हो, मला माहीत आहे जग फार पुढे गेले आहे ते.... पण मी नाही. मी अजूनही सनातन काळातला आहे, आणि तसाच राहणार. मला मुळात घटस्फोट पटतच नाही. पहिल्या पतीला सोडून दुसऱ्यांदा लग्न करून या घरात कोणी आली, तर ते मला खपणार नाही. मला हे घर भ्रष्ट झाल्यासारखं वाटेल. देवस्थानाची पूजा करतांना मला शुध्द वाटणार नाही. तेव्हा हे चालणार नाही.”

“पण अण्णा, घटस्फोट घेणं म्हणजे काही पाप असं का बोलता तुम्ही?” देवदत्त काकुळतीला येऊन म्हणाला, “स्त्रीने काही अक्षम्य गुन्हा केला असावा, असं....”

“हे बघ, माझ्या मते स्त्री-धर्म म्हणजे पतीला जन्माचा जोडीदार मानून त्याच्याबरोबरच पूर्ण आयुष्य कंठणे,” अण्णांनी आपले म्हणणे स्पष्ट केले, “हे एकाला सोडून पुन्हा दुसरे लग्न करणे माझ्या विचारात बसत नाही. दुसऱ्या लग्नाची गोष्ट राहू दे, आधी पतीला सोडणे हेच योग्य नाही.”

“अण्णा, कुणी सुखासुखी तर संसार मोडायला निघत नाही ना? तसंच सबळ कारण असेल तेव्हाच कुणी स्त्री असं पाऊल उचलेल ना?” देवदत्ताने पटवून देण्याचा प्रयत्न केला, “आणि आपण कोणा अपरिचित स्त्रीविषयी बोलत नाही आहोत ना? तुम्ही चैत्राला चांगलं ओळखता, आपल्या नारुकाकांच्या घरचीच ना ती?”

“काही स्त्रिया असतात फुलपाखरांसारख्या, मोठाल्या शहरात गेल्या कि त्यांना अजूनच पंख फुटतात. एका पतीची धनदौलत उधळून झाली कि द्या सोडून… मी अश्या स्त्रीला चांगल्या चालीची म्हणणार नाही.….”

“अण्णा!” मोठ्या प्रयासाने आपल्यावर संयम ठेवला तरी त्याच्या शरीराचा कंप त्याच्या आवाजात परावर्तित होत होता, “ज्या गोष्टींबद्दल माहीत नाही त्याबद्दल बोलू नये. चैत्राशी लग्न करण्याचा माझा निर्णय पक्का आहे.”

“एवढे लक्षात ठेव की तू हे पाऊल उचललेस तर मी तुला या कुटुंबातून तसेच देवस्थानाच्या अधिकारांतून बेदखल करेन. आपल्या घराण्याला तो वंशपरंपरागत मान मिळालेला आहे. अगदी आपल्या घरच्या लेकी-सुनांनाही देवस्थानाच्या कार्यांत भाग घेण्याचा मान व अधिकार मिळतो. तू या सर्वांला मुकशील…”

देवदत्तला लहानपणापासूनच चैत्राबद्दल थोडीफार ओढ होती. पण मग कामानिमित्ताने चैत्राचे कुटुंब मुंबईला जाऊन स्थायिक झाल्याने संपर्क तुटला होता. त्यानंतर देवदत्त शिक्षणासाठी पुण्याला गेला, नि तिथून नोकरीसाठी मुंबईला. तिथल्या आपल्या गावच्या माणसांना तो कधिमधी भेटत राही. तेव्हा त्याला कळले कि चैत्राचं लग्न होऊन आता तिच्या घटस्फोटाची बोलणी चालली होती. तो या बातमीने हबकलाच.

चैत्रा आणि सुरेशची ऑफिसेस एकाच इमारतीत होती. तिथेच चैत्राला पाहून, तिची माहिती काढून त्याने मागणीच घातली होती. तिच्या घरच्यांनी चौकशी केली, पण सगळं काही व्यवस्थितच होतं, तेव्हा थाटाने लग्न लावूनही दिलं.

पण लग्नानंतर सुरेशच्या एकेक वागणूकीने चैत्राला मनःस्ताप होऊ लागला. तो स्वतः दर दुसऱ्या दिवशी मित्रमैत्रिणींबरोबर -–मित्रापेक्षा अधिक मैत्रिणींबरोबर – पार्ट्या, सिनेमे सारे कार्यक्रम करीत असे. पण चैत्राच्या प्रत्येक हालचालींबद्दल संशय घेऊन भांडणे काढी. एकाच इमारतीत असल्याने कधीही अचानक तिच्या ऑफिसात येऊन थडके आणि तिला कुणा पुरुष सहकाऱ्याबरोबर बोलतांनाही पाहिले तरी भर ऑफिसमध्येही पाणउतारा करी. त्याचे स्वतःसाठी नि तिच्यासाठी वेगवेगळे नियम होते. चैत्राने खूप विरोध केला, बंडही केले. पण त्याची अरेरावी कायम राहिली. तिला ऑफिसात शरमेने मान खाली घालायची वेळ येई. तिचे सहकारीच समजून घेऊन तिच्याशी बोलणं टाळू लागले. पण ऑफिस म्हंटलं म्हणजे कामानिमित्ताने बोलावंच लागे – आणि नेमका तेव्हाच सुरेश आला कि झालं.

तिने नोकरी सोडून द्यायचाही विचार केला. पण मोठ्या शहरात दोघांच्या कमाई शिवाय राहता येणं कठीण, असं म्हणून तो नोकरीही सोडू देईना. याशिवाय तिची कमाईही तिच्या हाती राहू देत नसे, घरासाठी, वा काही ना काही कारण काढून खर्च करायला लावी. त्यामुळे ती आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र होऊच शकत नव्हती. चैत्रा विचित्र कोंडीत सापडून मनाने खचत चालली, त्याचा परिणाम तिच्या तब्येतीवर होऊ लागला. शेवटी घरच्यांनी बळजबरीने तिला घटस्फोटाचा अर्ज दाखल करायला लावला.

अश्या मानसिक ताणातून ती नुकतीच बाहेर पडली होती तेव्हा देवदत्त नि तिच्या जुन्या ओळखीला पुन्हा नव्याने उजाळा मिळाला होता. सुरूवातीच्या सहानभूतीचं लवकरच खोल प्रेमात रुपांतर झालं होतं. पण त्याने लग्नाचं विचारताच तिने तिथेच अडवलं होतं. “हे बघ, तू नीट विचार करून मगच ठरवावेस. ही तुझी माझ्या परिस्थितीविषयी केवळ सहानुभूती असू शकेल....” दोघांनीही थोडा अवधी थांबण्याचं ठरवलं. पण तरीही देवदत्ताचा निश्चय कायमच राहिला. मगच त्याने गावी अण्णांच्या कानावर ही गोष्ट घातली होती.

देवदत्तला वडिलांच्या शब्दाबाहेर जाऊन घरच्यांशी संबध तोडण्याची अजिबात इच्छा नव्हती. पण तो मोठं पाप करत आहे असंही त्याला वाटत नव्हतं, व हे पटतही नव्हतं. या मानसिक द्वंदाने तो पार थकून जाई. चैत्रानेही त्याला समजावण्याचा खूप प्रयत्न केला, त्याची मैत्री लाभली, ती सुध्दा अश्या बिकट वेळी, हेच तिच्यासाठी फार होते; लग्न त्याने त्याच्या आईवडिलांच्या म्हणण्यानुसारच करावे, त्यांना दुखवू नये.

पण तो काही चुकीचं करत नव्हता या विश्वासाने त्याने चैत्राशी लग्न केले, त्यानंतर गावी जाणेयेणे तर संपलेच होते. अण्णा घरी नसण्याच्या वेळा त्याला ठाऊक असल्याने, त्याच वेळांमध्ये आईला फोन करून तो संपर्कात राहिला होता. तो वारंवार आईला सांगत राही, “अण्णा स्वतःला त्रास करून घेणार नाहीत असे तुला जेव्हा केव्हा वाटेल तेव्हा सांग. आम्ही यायची वाटच पाहात आहोत.” ते या वयात त्रागा करून स्वतःला त्रास करून घेतील या भीतीने ते दोघेही दूर राहिले होते.

पण आता त्याला राहवलं नाही. आईने अडखळत जेवढे सांगितले त्याहूनही जास्त काही झाले असावे हीच त्याला भीती होती. त्याला पाहून अण्णा चिडले

आणि त्यांची तब्येत अधिकच बिघडली तर? ही शंका होतीच. म्हणूनच चैत्राने सुरुवातीला काकांकडे राहायचे ठरवल्यावर त्याने आक्षेप घेतला नव्हता. त्याला एकट्याला पाहिले तरी चिडू शकतील, पण तो नेहमीसाठीच वडिलांपासून दूर राहू शकत नव्हता ना? कधीतरी सामोरे जायला हवेच. आणि त्यांच्या आजारात तो स्वतःचे कर्तव्य करणार नाही हे तर शक्य नव्हते.

देवने मुद्दामच दिवेलागणीनंतरच ते पोहोचतील असा प्रयत्न केला. गावी पोहोचले तेव्हा अंधारू लागलं होतं. प्रथम सुयश आणि चैत्राला तिच्या काकांकडे पोहोचवले. तोही नारूकाका नि त्यांच्या घरच्या मंडळींना भेटला, औपचारिक दोन शब्द बोलून निघाला. अण्णांना पहाटे लवकर उठायची सवय, त्यामुळे या वेळेपर्यंत जेऊन त्यांच्या वरच्या खोलीत ते गेले असणार याची त्याला कल्पना होती. म्हणजे गेल्यागेल्याच त्यांच्या रागाचा विस्फोट व्हायला नको.

देवदत्ताने कार वाड्यापर्यंत न नेता देवस्थान नि घराच्या मधल्या बोळात थांबविली आणि छोटी बॅग हातात घेऊन शक्यतो आवाज न करता फाटक उघडून घरात शिरला. समोर दिवाणखान्यात कोणी नव्हते. तिथून माजघरात जाईपर्यंत दुर्गाने त्याला पाहिले. “दादा? तू कसा आलास?” तिच्या गोंधळलेल्या आश्चर्यापेक्षाही देवदत्तला तिच्याकडे पाहून धक्काच बसला. “दुर्गा? अग, काय झालं तुला? अशी …एवढी वाळलीस कशानं?” दुर्गा हसली, “मी ठीक आहे की….” म्हणत त्याला घेऊन स्वयंपाकघराकडे वळली. त्याला इतक्या वर्षांनी बघून आईचे डोळे पाझरू लागले.

“आई, अण्णा कसे आहेत? नेमकं काय झालयं त्यांना?” त्याने आधी विचारले.

"तसे बरे आहेत, वर आराम करताहेत..." आई डोळे पुसत म्हणाली, "आता तू गप्पच राहा. मी उद्या सकाळी सांगते त्यांना तू आल्याचं. आता तुला पाहून चिडले तर रात्रभर त्रास होईल.... त्यापेक्षा उद्याच बोलू..."

"बरं..पण आई, या दुर्गाला काय झालयं? इतकी रोडावली कशानं?" असे तो विचारेपर्यंत दुर्गा आपल्या मुलीला शोधायच्या निमित्ताने बाहेर गेली. त्यामुळे तर तो अजूनच बुचकळयात पडला. "काय झालयं? काही आजार दुखणं वगैरे...?"

"आता काय सांगणार? आजार लागलाय नशिबालाच..." आईने सुस्कारा टाकला, "ते मागाहून बोलू. तू आधी तुझं सगळं सांग...इतक्या वर्षांनी येतो आहेस... कसे आहेत चैत्रा नि बाळ? त्यांना नाही आणलंस, एकटाच आलास?"

ते दोघे नारूकाकांच्या घरी असल्याचं, आणि अण्णांनी मान्य केलं तर त्यांना घेऊन यायचा विचार देवदत्ताने सांगितला. अण्णांचं आणि दुर्गाच्या सोनालीचं जेवणं नुकतंच झालं होतं. मग ते तिघे स्वयंपाकघरातच हळु आवाजात बोलत जेवले. त्या दोघी देवदत्तालाच विचारत राहिल्या, पण त्याच्या अण्णांच्या तब्येतीविषयीच्या आणि दुर्गाबद्दलच्या प्रश्नांना उत्तर न देता, टाळत राहिल्या. त्याने तो अधिकच अस्वस्थ होत गेला. पण जास्त बोलण्याने अण्णांना वर ऐकू जाईल या विचाराने फार जोर देऊ शकला नाही.

दिवाणखान्यात पथारी पसरून तो निजला पण आपल्या जुन्या घरात – साऱ्या आठवणी, आताचे प्रश्न, या सर्वांचा मनात उडालेल्या कोलाहलामुळे नीट झोप लागली नाही. पहाटे देवस्थानाच्या काकडआरतीच्या स्वराने जाग आली. आता अण्णा जाऊ शकत नाहीत तर बहुधा समोरच्या महादेवभटजींना ते काम दिलं असणार...

तोंड धुवून चहा घेईपर्यंत वरून अण्णांचा स्पष्ट स्वर ऐकू आला. बहुधा आईने तो आल्याचे सांगितले असावे. तोवर आई खाली आलीच नि म्हणाली, “जा तू, मी सांगितलयं त्यांना तू आल्याचं. पण जरा जपूनच बोल हं…” तो मान डोलावत जिना चढून वर गेला. अण्णांसमोर नमस्काराला वाकला.

“काय? पोहोचवायला आलात आम्हाला?” आजाराने अण्णांच्या आवाजात काही फरक झाला नव्हता, त्याच दणदणीत स्वरात म्हणाले, “तुमच्या आईने लगेच बोलावून घेतले असेल तुम्हाला….”

“नाही, ती फोनवर नीटसं सांगत नसावी असं वाटलं म्हणून म्हंटलं प्रत्यक्षात जाऊन बघावं…” तो शक्यतो नरम आवाजात बोलला, “डॉक्टर काय म्हणतात अण्णा? असं अचानक बीपी वाढायला कारण….”

“आता कारण कसले विचारता चिरंजीव?” ते जरा उपहासानेच म्हणाले, “घरात एक अमंगल गोष्ट झाली की पुढे सगळे वाईटच व्हायचे ना….” अण्णा अजूनही आपला हेका सोडायला तयार नव्हते. देवदत्ताने मनातल्या मनात उसासा टाकला. बरं झालं चैत्रा नि सुयश त्याच्यावरोबर इथे आले नाहीत, नाही तर त्यांचा पारा अजूनच चढला असता.

“असं का म्हणता अण्णा?” तो जरा दुखावलेल्या स्वरात म्हणाला, ‘चैत्रामुळे काही अशुभ झालेलं नाहीये…”

“हे वर तोंड करून बोलतोस?” ते चिडून गरजले, “अरे बहिणीच्या आयुष्याची पुरती राखरांगोळी झाली. दिसत नाही तुला तिची अवस्था आपल्या

डोळयांनी? आणि तरी म्हणतोस काहीच झालं नाही? का तुझ्या डोळयावर कातडे ओढले आहे – त्या स्त्रीच्या प्रभावाचे….?"

"दुर्गाची अवस्था? काय झालयं?" देवदत्ताने विचारले, "मी आल्यापासून वारंवार खोदून विचारले, पण कोणी काही सांगेना …. काय झालयं काय? पण तिची अवस्था आमच्यामुळे…"

"हं…आता तू हात झटकून मोकळा होणारच!" ते चैत्रावरचा राग सोडायला तयार नव्हते, "तरी मी आधीच बजावलं होतं, पण माझं कशाला ऐकशील…"

"अण्णा, दुर्गाला काय त्रास आहे? तिची तब्येत अशी…." अण्णा जेव्हा तेच तेच बोलायचं सोडत नाहीत हे त्याच्या लक्षात आलं तेव्हा त्याने विषय मुख्य प्रश्नाकडे वळवण्याचा प्रयत्न केला.

"आता तब्येतीचं काय विचारतोस जिवंत वाचली हेच नशिब समजायचं," अण्णा हताशपणे हवेत हात उडवून म्हणाले.

"अण्णा! काय बोलताहात? असं काय झालं…?" ऐकून देव चांगलाच चमकला, "काही अपघात? मोठा आजार?"

"अरे…तो..तो..नवरा तिचा! आमचे जावईबापू! मोठ्या घरंदाज खानदानातले!" अण्णा हवेत हात नाचवत गरजले. त्यांचा त्रागा पाहून देवदत्ताच्या छातीत धडधडले. अश्या रागाने त्यांचीच तब्येत ढासळायची. पण ते आता ऐकायला तयार नव्हते. "माहीत आहेत त्याचे प्रताप? अरे उपाशी ठेवत होता – उपाशी ठेवत होता माझ्या पोरीला!" बोलता बोलता ते गदगदले. देवदत्तने पट्कन

त्यांच्या पाठीवर हात ठेवला, बळजबरीने त्यांना हाताला धरून पलंगावर बसवलं. बाजूच्या तांब्यातलं पाणी फुलपात्रात ओतून त्यांना प्यायला दिलं.

पाणी पिऊन अण्णा तितक्याच आवेगानं पुन्हा बोलू लागले, "त्याची ती दूषित नजर देवस्थानावर होती रे… राजकारण खेळतो राजकारण! आपल्या लेकी-सुनांनाही देवकार्यात मान नि अधिकार असतो. तो चांडाळ दुर्गीच्या पाठी हात धुवून लागला कि तिने तिचा अधिकार त्याच्या नावे लिहून द्यावा. कसही करून एकदा या देवस्थानाच्या कमिटीत घुसायला मिळाले म्हणजे मग ट्रस्टच्या खजिन्यावर डल्ला मारायला सुलभ ना! शिव शिव! असे पापी विचार येतातच कसे मनात? पोरीनं मानलं नाही तर तिला उपाशी कोंडून घालायचा रे---" ते पुन्हा रडकुंडीला आले.

"पण तिने हे तुम्हाला लगेच सांगितलं का नाही…?" देवदत्तच्या मुठी वळू लागल्या.

"तिची तब्येत खालावत चालली होती ते दिसलं मला, पण विचारलं तर काही नाही झालयं असं म्हणून काही थंडीताप, पोटदुखी अशी कारणं सांगायची. दहा दिवसांपूर्वी तिथे गेलो होतो, तर बघवेना अशी अस्थिपंजर झाली होती. तरी बोलली नाही. त्यांच्याच घरच्या नोकराने मला बाजूला घेऊन सांगितले तेव्हा कळले. अरे देवा! ती अधिकार त्याच्यानावे लिहून देत नाही असं पाहिल्यावर तो राक्षस तिला छळू लागला कि माहेरी जाऊन बापाकडून दरमहिना पैसे घेऊन ये. एवढ्या मोठ्या देवस्थानाचा मुख्य पुजारी, तर दक्षिणाच खंडीभर मिळत असेल. नातीच्या नावानं दे म्हणे दरमहा वीसपंचवीस हजार तरी---" अण्णा रागाने थरथर कापत होते, "अरे, जीभ कशी रेटली त्याची असं बोलायला! देवस्थानाकडून मिळणाऱ्या वेतनाखेरीज एका पैशालाही स्पर्श केला नाही या विष्णूभटानं. हो,

श्रीमंत, पैसेवाले भाविक घालायचे नोटाच्या नोटा पूजेच्या थाळीत, पण कधी मोह नाही केला देवाच्या पैशाचा. सगळे उचलून हुंडीत जमा केले. वेतन आणि प्रसादाखेरीज काही नाही घेतलं – नाहीतर सोन्याने मढवले नसते का आपल्या बायको मुलीला? नादारी आणि स्कॉलरशिपवर शिकवलं दोन्ही मुलांना. आणि हा – हा म्हणतो---"

"शांत व्हा अण्णा," त्यांच्या हातावर हात ठेवत देवदत्त म्हणाला, "आता पुढे काय करायचं हे महत्त्वाचे. त्याला बोलावून समजावावे का चार जाणत्या माणसांकडून ताकीद देऊन..."

"ताकीद देऊन काय करायचंय? पोरीला परत पाठवायचं त्या नरकात?" अण्णा त्वेषाने बोलले, "एकदा कळलंय कि तो किती खालच्या पातळीवर जाऊ शकतो, स्वार्थासाठी किती राक्षसी कृत्य करू शकतो ...त्यानंतरही मुलीला परत त्याच घरात पाठवायचं? शक्य नाही, मी ते करू शकणार नाही...."

"तसं पाहिलं तर आपल्यासमोर दोनच पर्याय आहेत अण्णा," देवदत्त थोडा अडखळत म्हणाला, "एकतर दुर्गाने पतीच्या घरी परत जायचं – किंवा – पतीशी घटस्फोट घ्यायचा....."

"अं?" अण्णा जरा दचकलेच. पण नेहमीप्रमाणे पट्कन तिरीमिरीने काही उलट बोलले नाहीत. त्याच्या बोलण्यावर विचार करत असावेत असे क्षणभर गप्प राहिले मग म्हणाले, "परत पाठवण्याचा आता प्रश्नच नाही......"

"बरोबर आहे, परत पाठवताच कामा नये," देवने दुजोरा दिला, अण्णांचे घटस्फोटाविषयीचे विचार माहीत असल्याने त्याने तिसरा मार्ग सुचवला, "इथेच राहू

दे तिला नि सोनालीला, त्या घरी पुन्हा जायची गरज नाहीये. हे ही तिचच घर आहे ना?"

"लग्न झालेली मुलगी नवऱ्याला सोडून माघारी येऊन राहिली, तर नवरा कसा आहे ते कोणी बघणार नाही," अण्णा हताश स्वरात बोलत होते, "लोकं दहा तोंडांनी तिच्याविषयीच वाईटसाईट बोलतील." अण्णांना इतक्या हरलेल्या स्थितीत देवने कधी पाहिले नव्हते, त्याला गलबलून आले.

"ज्याचं जळतं त्यालाच कळतं, लोकांचं काय जातयं बोलायला. आपण लक्ष द्यायचं नाही....." देव समजावत म्हणाला.

"माझ्या निर्दोष मुलीबद्दल कोणी काही बोललेलं मला खपणार नाही...." अण्णा स्वतःशीच बोलल्यासारखे पुढे म्हणाले, "शेवटी, घटस्फोट घेणे हाच पर्याय शिल्लक राहतो..."

अण्णांचे पाच वर्षांपूर्वीचे अपमानास्पद शब्द नेहमीच देवदत्तच्या मनात घर करून राहिले होते – आता त्याला खूप उर्मी झाली कि उपरोधिकपणे ऐकवावे, 'पण अण्णा तुमच्या मते तर पतीला सोडून देणारी, घटस्फोट घेणारी स्त्री ही चांगल्या चालीची नसते ना?' अर्थात, त्याने यातील एकही शब्द उच्चारला नाही, काही बोललाच नाही. कोणाच्याही दुःखावर डागण्या देण्यात पुरुषार्थ नव्हता. आधीच त्यांची तब्येत अशी होती की त्यांना जपणे, शांत करणे अधिक आवश्यक होते. त्यांचेच शब्द त्यांच्यावर उलटवून त्यांच्या जखमेवर मीठ चोळणे योग्य नव्हते.

तो गप्प राहिला, पण त्याच्या मनातलेच शब्द मागच्या बाजूने कोणीतरी कापऱ्या आवाजात बोललेच. दुर्गा केव्हा तेथे येऊन उभी राहिली होती हे त्या दोघांनाही कळले नव्हते…

“पण अण्णा, घटस्फोट कसा घ्यायचा?” दुर्गा कोरड्या स्वरात बोलली, “तुम्हीच तर म्हणता ना कि स्त्रिचा धर्म पतीला परमेश्वर मानून जन्मभर त्याची साथ न सोडता सेवा करणे हाच असतो. घटस्फोट घेणाऱ्या स्त्रिया तर – चांगल्या वळणाच्या नसतात असं तुम्हीच तर म्हणाला होतात ना?”

अण्णा चमकले. पण मुलीवर रागावू शकत नव्हते. त्यात पुन्हा, तिने त्यांचेच शब्द तर त्यांना ऐकवले होते, चिडणार कसे? “हो, बोललो होतो मी,” ते घसा साफ करत म्हणाले, “पण प्रत्येक परिस्थितीत फरक असतो. या नराधमाची वागणूक सहन करणं म्हणजे स्वतःच आत्महत्या करण्यासारखं आहे….”

“पण मग तुम्ही हे कसं ठरवलंत की चैत्रावहिनीची परिस्थिती वेगळी, किंवा अगदी उलट होती म्हणून?” दुर्गा शांतपणे, भाल्यासारख्या टोकदार आवाजात बोलत होती, “केवळ शहरात राहणारी म्हणजे तिने स्वतः पतीला सोडले असे सिध्द होते का? तिचा पती काही अत्याचार करतच नव्हता, केवळ तुमचा जावईच करतो?”

“ते – ते काही मला माहीत नाही… मला बरोबर वाटले नाही…” अण्णांना बोलायला सुचले नाही.

“तर मग तिच्या कपाळी वाईट चालीची हा छाप लावण्याआधी माहीत करून घ्यायला हवे होते ना? तुम्ही माझ्याबद्दल कसे सर्व जाणून घेतले, तसेच तिच्याबाबतीत काय सत्य आहे हे जाणून घेण्याआधीच शिक्का लावून मोकळे

झालात? आणि घरात घडणाऱ्या प्रत्येक वाईट गोष्टीचा दोष तिच्या माथी का? दादाने तिच्याशी लग्न ठरवायच्या कितीतरी आधी तुम्हीच माझे लग्न लावून दिले होते ना? वहिनीचा या कुटुंबाशी संबध यायच्या दोन-चार वर्षे आधीपासूनच तुमचा जावई.. असाच…असाच वागत होता. तुम्हाला, आईला दुःख होईल म्हणून मी काही बोलत नव्हते. आताही काही बोलले नव्हते, तुम्हालाच कुठून कळले… पण हे जे आधीपासूनच होत होते त्याचा दोष वहिनीला का? ती वाईट का? घटस्फोट घेतला होता म्हणून? म्हणजे आता मी ही त्याच पंक्तीला जाऊन बसणार ना? तुम्हीच आता म्हणालात कि मला घटस्फोट घ्यावा लागेल, आणि तुम्हीच म्हणाला होतात की…"

"बस्स कर…थांब…" अण्णा ढेपाळल्यासारखे पलंगावर बसले, "मला..मला जरा विचार कराय…"

"हो अण्णा, विचार कराच," दुर्गा म्हणाली, "चैत्रावहिनीही माझ्यासारखीच होरपळलेली स्त्री आहे. छळाचा प्रकार वेगळा असेल, पण यातना तर त्याच, तश्याच ना? ती वाईट चालीची असती तर दादाशी इतका पाच वर्षांचा सुखाचा संसार केला असता तिने? तुम्हाला एक नातूही आहे अण्णा. तुमच्या चिंतेने ती पण धावत आली, नारूकाकांच्याकडे आहेत…"

अण्णा जमिनीकडे पहात स्तब्ध बसून राहिले. देवने अस्वस्थपणे चुळबूळ केली. अण्णांची इच्छा नव्हती हे साफ दिसत होते, तर का या विषयावर उगाच अवघडलेपणा निर्माण करायचा. तो म्हणाला, "ते जाऊ दे, दुर्गा. आत्ताचा महत्त्वाचा प्रश्न आहे तो तुझ्या भविष्याचा. त्याबद्दल काय करायचे हे आधी ठरवायला हवे….."

अण्णांनी घसा साफ करत दोघांचे लक्ष वेधून घेतले. “देवदत्ता,” ते हळू पण स्पष्ट स्वरात म्हणाले, “जा … सुनबाईला आणि मुलाला घेऊन ये ह्या त्यांच्या घरी…”

“अण्णा!” दुर्गाने निःश्वास टाकत हुंदका दाबला. देवदत्ताने जवळ जाऊन वडिलांचा हात हातात घेतला.

.

# गुपित

“निरव, अरे पेपरमध्ये हे काय आलयं?...” श्रेयाला अशी आशा होती की तो म्हणेल ते खोटं आहे, उगीच कुणीतरी छापून दिलयं…

“काय आलयं पेपरात?” जणू काय त्या गावचेच नसल्यासारखा निरवने उलट प्रश्न केला. तेव्हाच श्रेयाच्या लक्षात आले कि वाचलेले खरे होते आणि तो आता मुद्दामच वेड पांघरून पेडगावला जात होता.

“हेच, कि तू पुस्तक … म्हणजे चरित्र लिहिणार आहेस --- अवंतिकाजींचं….” तिनेही गप्प न राहता विचारलेच.

“ते होय?.. अं…हो, प्रकाशकांनी मला विनंती केली, खूपच विनवले. मग मीही म्हंटलं, लिहू या…” त्याने बेफिकिर स्वरात उत्तर दिले. श्रेयाला त्याचं ते बोलणं, तो बेपर्वा सूर चांगलाच खटकला, “अरे पण ….”

“हे बघ श्रेया, मला जरा काम आहे, बाहेर जायचंय. आपण नंतर बोलू, ओके?” त्याने अक्षरशः तिचं तोंडचं बंद केलं. रागाने तिचे ओठ मिटले, तिने फोन खाली ठेवला, पण मनाशी हे ठरवूनच कि त्याने कितीही टाळण्याचा प्रयत्न केला तरी प्रत्यक्ष भेटल्यावर हे विचारून घ्यायचेच.

आणि ते भेटल्यावर निरवला विषय बदलू न देता तिने विचारलेच, “तू जे करतो आहेस ते तुला बरोबर वाटतं का, निरव? अवंतिकाजींचं आयुष्य अस चार लोकांत…..”

“त्यात तुला काय प्रॉब्लेम आहे, हं?” निरवने जरा आक्रमक सुरातच तिला अडवले, “ती माझी मावशी होती, प्रकाशकांनी मला विचारले, मी लिहिणार…. किती खप होईल, कल्पना आहे तुला?”

“केवळ खप होईल म्हणून तू त्यांचं आयुष्य असं…असं चव्हाट्यावर आणणार?” तिने किचिंतश्या घृणेने विचारले, “अरे, तुला तर माहीतच आहे ना लोकं कशी असतात ते? त्यांना अस काहीतरी चटक-मटक हवच असतं, जिभल्या चाटत तुटून पडायला…..पण आपणच आपलं तारतम्य राखलं पाहिजे ना?”

“तेवढी अक्कल मलाही आहे बरं का –“ तो जरा उपहासाने म्हणाला, “तू मला शिकवू नकोस कि मी माझ्याच मावशीबद्दल काय लिहावे नि काय नाही.” त्याने तो विषय तेवढ्यावरच संपवला. त्याच्या मते त्याने पुरेसा खुलासा आणि आश्वासन दिल होतं….खरं तर, त्याने तिला का खुलासा द्यावा, ती काय श्रेयाची मावशी होती का? अशीच काहीशी त्याची भूमिका होती. खरचं, तिचा काय तसा संबंध होता, इतकं हक्काने जाब विचारण्याचा.

अवंतिकाजी चित्रपटसृष्टीच्या प्रख्यात अभिनेत्री राहिल्या होत्या, वर्षानुवर्षे त्यांच्या असामान्य रूपाची, अतुलनीय अभिनयाची प्रशंसा करता करता नियतकालिके थकली नव्हती. वय उताराला लागल्यानंतरही त्यांच्या रूपात, अभिनयात फारसा फरक आला नव्हता. त्यांनी स्वतःच हळूहळू काम करणे कमी केले होते. पण लोकांचे त्यांच्याविषयीचे कुतूहल कमी झाले नव्हते.

त्याला कारणही तसेच होते. अवंतिकाजींभोवती किंचितसे गूढतेचे वलय होते. त्या फक्त आपल्या व्यावसायिक जीवनाबद्दल वार्ताहरांशी, मिडियाशी बोलत, पण आपले खाजगी जीवन त्यांनी कसोशीने लोकांच्या नजरेपासून दूर ठेवले होते. अवंतिकाजींनी कधीच लग्न केले नव्हते, पण त्यांच्या दीर्घ व्यावसायिक आयुष्यात बरेच पुरुष येऊन गेले होते ... विविध क्षेत्रातील, विशेषतः चित्रपटसृष्टीतील अनेक प्रसिध्द व्यक्तिंबरोबर त्यांचे नाव जोडले गेले होते, आणि या संबंधांमुळे त्यांच्या जीवनात बरीच वादळे येऊन गेली होती.

पण या सर्वांबद्दल गॉसिप-मासिकांमधून केवळ अंदाजच वर्तविले गेले होते, प्रत्यक्षात त्यांच्या आयुष्यात केव्हा काय घडले याचा त्यांनी कधी उच्चारही केला नाही. आणि त्यांच्या आयुष्यात आलेल्या त्या अनेक पुरुषांनीही, बाकी तपशील तर दूरच, कधीही वैयक्तिक स्वरूपात त्यांचे नावही घेतले नाही. या संबंधांखेरीज ---- किंवा या संबंधांमुळे, उद्भवलेल्या बऱ्याचश्या घटनाही वार्ताहारांनी, केवळ 'आपला अंदाज' म्हणून वर्तवल्या होत्या....... जसे त्यांच्या आयुष्यात आलेल्या कुणाच्या पत्नीने केलेला आत्महत्येचा प्रयत्न, तर कुणाच्या कुटुंबियांनी अवंतिकाजींच्यावर हल्ला करण्याचा केलेला कट, अश्या अनेक गोष्टींच्या वावड्या उठल्या होत्या. पण --- सत्य काय हे कुणालाच कळले नव्हते.

या सर्वांमुळे लोकांची उत्सुकता बरीच ताणली गेली होती, पण अवंतिकाजींनी गर्विष्ठपणा न दाखवताही, सर्वांशी खेळीमेळीने वागूनही सर्वांनाच आपल्यापासून दोन हात अंतरावरच ठेवले होते. त्यांचा आपला स्वतःचा संसार नव्हताच, म्हणून लग्न होऊन परदेशी गेलेल्या धाकट्या बहिणीच्या मुलाला,

निरवला, आपल्याजवळ ठेऊन वाढविले होते. तो सात वर्षांचा असल्यापासून त्यांच्याच घरात वाढला, शिक्षण वगैरे सर्वकाही तिथेच झाले होते.

श्रेयाला तो तिच्या मैत्रिणीकडच्या पार्टीत भेटला होता. मागाहून जेव्हा तिला कळलं की तो एवढ्या प्रसिध्द अभिनेत्रीचा भाचा होता आणि त्यांच्याच घरात राहात होता, तेव्हा ती अंमळ अंतर राखूनच त्याच्याशी वागत राहिली. पण कालांतराने आणि वाढत्या मैत्रीने तिला पटले की तो खरोखरच सर्वार्थाने एक चांगला तरूण होता, आपल्या सीएच्या कामात तरबेज होता आणि फिल्मी वातावरणात वाढूनही त्याला त्या झगमगत्या चित्रपटसृष्टीचं वारं लागलं नव्हतं. म्हणजे तसं पाहिलं तर अवंतिकाजींनी त्याला उत्तम प्रकारे मोठं केलं होतं. त्याच्या खऱ्या स्वभावाची ओळख पटल्यावर त्यांच्या दाट मैत्रीचं रुपांतर हळूहळू प्रेमात झालं होतं.

आपला व्यावसायिक जम बसल्यावर निरव वेगळं घर घेऊन स्वतंत्रपणे राहू लागला होता, अर्थातच तो आपल्या मावशीच्या सतत संपर्कात होताच. श्रेयालाही तो त्यांच्याकडे भेटायला घेऊन जाणार होता, परंतु त्याआधीच अकस्मात एका मोटार अपघातात अवंतिकाजींचं निधन झालं. निरवला जबर धक्का बसला होता, पण त्यातून तो हळूहळू सावरला, किंवा निदान तसे दाखवत होता.

त्या गोष्टीला वर्ष होऊन गेले होते --- आणि आता मध्येच हे त्यांच्या चरित्र-लेखनाचे खूळ उभरले होते. कोण जाणे कुणी ही मिनिटात नाव आणि खूप पैसा कमावण्याची कल्पना निरवच्या डोक्यात भरवली होती? त्याच्या डोळ्यासोर असं काही झगमगीत चित्र उभं केलं होतं की निरव आपला नेहमीचा तरतमभावही विसरला नि आपल्या मावशीचं खाजगी जीवन सर्वांपुढे झळकवण्यास तयार झाला होता.

जर का आपल्या आयुष्यातील घडामोडी लोकांत जाहीर करण्यामध्ये अवंतिकाजींना काही हरकत नसती तर त्यांनी आपल्या हयातीतच स्वतःच सर्व जगजाहीर केलं असतं. त्यांनी तसं केलं नाही, तर मग त्यांच्या खाजगी जीवनात अतिक्रमण करणारे आपण कोण? निरव जरी त्यांच्या मुलासारखाच असला तरीही जे काही करायचे ते त्यांच्या पूर्वपरवानगीनेच करायला हवे. आता त्यांच्या पश्चात, जेव्हा त्या निरवला अडवू शकत नव्हत्या तेव्हा आपल्याला माहीत असलेले सर्व छापणे कितपत योग्य होते?

निरव तिला सर्वार्थाने आवडत होता, जीवनाचा साथीदार म्हणून मनाला भावला होता. अश्या कचकड्याच्या वातावरणात वाढूनही पाय जमिनीवर घट्ट रोवून, डोके खांद्यावरच वागवणारा तरुण होता. तिला त्याच्या फिल्मी नात्यांचं आकर्षण नव्हतं, ही तिची गोष्ट त्याच्यासाठीही महत्त्वाची होती. असे सर्व काही व्यवस्थित असतांना, मध्येच हे काय उपटावे?

त्याने दिलेल्या आश्वासनाने ती थोडी निश्चिंत झाली होती. पण काही दिवसांतच वर्तमानपत्रात मोठी जाहिरात आली – ‘आमच्या आगामी प्रकाशनाची आकर्षणेः जगविख्यात तारकेच्या आजपर्यंत कोणालाच माहीत नसलेल्या खाजगी जीवनाबद्दल, आणखीही बऱ्याच वैयक्तिक गोष्टींबद्दल सर्वात जवळच्या कुटुंबियाने प्रत्यक्षात पाहिलेली जीवनगाथा!!’

श्रेयाने फोन करण्याची वाट न पाहता, त्याआधीच निरवने स्वतः तिला फोन केला, “मला माहीत आहे आता तू काय म्हणणार ते – पण तू वाचलंस त्यात काही तथ्य नाही. अग, खप वाढविण्यासाठी प्रकाशन कंपनीला अश्या जाहिराती कराव्या लागतात, तो त्यांचा व्यवसायच आहे. तेव्हा तू त्याकडे लक्ष देऊ नकोस....”

दुसऱ्या दिवशी निरवनेच तिला त्याच्या घरी बोलावले, त्याला बरेच काम होते त्यामुळे मूव्ही, डिनर वगैरे बाहेर जाणे शक्य नव्हते. अर्जुन, त्याचा खास दोस्तही येणार होता. अश्या त्यांच्या छोट्या महफिली बऱ्याचदा होत असत. ती पोहोचली तोवर अर्जुन आलेला नव्हता. श्रेयाने स्वतः करून आणलेले पुडिंग फ्रीजमध्ये नेऊन ठेवले नि बाहेर येऊन बसली. निरव काम करता करताच उत्साहाने – जरा जास्तच उत्साहाने?--- इकडच्या तिकडच्या गोष्टी करत होता. तिला काही बोलायला, तो विषय काढायला वेळच मिळू नये, यासाठी?

पण तरीही श्रेया बोललीच, "अजूनही विचार कर, निरव. मला नाही वाटत की तू त्यांच्या खाजगी….."

तिला पूर्ण बोलण्याची संधी न देता, तो मध्येच म्हणाला, "तुला एकदा सांगितलं ना? विश्वास नाही माझ्यावर?" काही न बोलता ती संथ नजरेने पाहात राहिली आणि त्या नजरेने शब्दाविनांच स्पष्ट केले की खरोखरच तिला त्याच्या शब्दावर विश्वास नव्हता – निदान या बाबतीत तरी. तेव्हा मग मान हलवत त्यानेही, तसं आडवळणानेच, स्वीकारले, "ठीक आहे, समज तुला जे समजायचं ते… मी ठरवेन काय करायचं ते, तू कोण बोलणारी मला?"

"त्या माझ्या कोणी होत्या का नाही हा मूळ मुद्दा नाहीये, निरव," तिने समजावण्याचा प्रयत्न केला, "कोणाही व्यक्तीने तसं लेखी लिहून दिल्याखेरीज असं काही लिहिण्याचा कोणालाही अधिकार कसा असेल? काही नैतिक जबाबदाऱ्याही असतातच ना? केवळ आपल्याला सगळं माहीत आहे म्हणून…"

“तू मोठी प्रवचनं देऊ नकोस, कळलं?” तो तिला मध्येच तोडत तिरसटून बोलला, “काय मोठ्या नैतिकतेच्या गप्पा मारतेस? तसं तर जगाला सर्व माहीतच आहे, मी फक्त प्रत्यक्षात जसं काही घडलं....”

“अरे कोणा परक्या, अनोळखी व्यक्तिबद्दल बोलावं तसं इतक्या त्रयस्थपणे कसं बोलू शकतोस?” ती एकदम उद्वेगाने म्हणाली, “मावशी होती ती तुझी, आईच्या ठिकाणी. तिनेच तुला वाढवून मोठं केलं ना...”

“या अश्या गोडगोड गोष्टी तू मला शिकवू नकोस,” निरवने राग लपवण्याचाही प्रयत्न केला नाही, “या गोष्टी फक्त सांगायला-ऐकायला बऱ्या वाटतात. मला मोठं केलं म्हणजे माझ्यावर काही उपकार केले नाहीत -–मी काही अनाथ नव्हतो. तिने स्वतःची हौस भागविण्यासाठी मला आणून ठेवलं इथे, माझ्या परिवारापासून, माझ्या आईवडिलांपासून, भावंडांपासून दूर. तिचे जसे चार कुत्रे होते, तसाच मी पाचवा. तिला झटका आला की मोठे लाडकोड करायची, एरवी कितिकदा तर मी घरात आहे की नाही याचीही तिला पर्वा नसे -- वाढवलं म्हणे...”

“असं कसं म्हणतोस तू?” श्रेयाही हट्टाला पेटून त्याला समजावत राहिली, “आईवडिलही काय दिवसाचा प्रत्येक क्षण आपल्या मुलांना डोक्यावर घेऊन फिरतात का? आई कसल्या कामात व्यग्र असेल तर मुलाला धपाटा घालून म्हणत नाही का, जा इथून, छळू नकोस मला थोडा वेळ? मग मुलं असं म्हणतात का कि आईवडिलांनी स्वतःच्या खुशीसाठी आम्हाला जन्माला घातलं, नको असेल तेव्हा पळवून लावायला? – अरे, त्यांनी जे केलं ते तू नजरेआड करून फक्त नकारात्मक गोष्टींवर भर देत आहेस. –केवळ स्वतःच्या अश्या या वागण्याचं स्वतःलाच समर्थन देण्यासाठी?.....” बोलण्याच्या ओघात ती बोलून गेली, नि मग तिच्या लक्षात आलं

कि सत्य बोलून तिने तशी मर्यादा ओलांडली होती. आता तो नक्कीच भयंकर चिडला होता, तो जवळजवळ ओरडणारच, तेवढ्यात अर्जुन आला आणि त्यांच्यातला तो स्फोट दोघांनाही तिथेच दाबून ठेवावा लागला.

दोघेही मित्र गप्पांत रंगले, नेहमी ते तिलाही सामील करून घेत, पण आपला पराकोटीचा राग दर्शविण्यासाठी निरव मुद्दामच तिच्याकडे साफ दुर्लक्ष करत होता आणि या पार्श्वभूमीची काहीच माहिती नसलेल्या अर्जुनच्या ध्यानात ही गोष्ट आलीच नाही. श्रेयानेही मध्येच बोलण्याचा प्रयत्न केला नाही – ती आपल्याच विचारात गढून गेली. खरच, आपल्याला काय करायचयं? तो आणि त्याची मावशी, आपला त्यात काय संबंध? निरव तिचं भविष्य होता, तिचं सर्वस्व होता. एका मृत अभिनेत्रीच्या चरित्र-लेखनावरून ती आपलं सगळं भविष्य उधळून द्यायला का निघाली होती? आत्ताच तो इतका भडकला होता. जर तिने हा पाठपुरावा असाच चालू ठेवला, त्याला पटवत राहिली तर चरित्र-लेखनाचा विचार सोडण्याऐवजी कदाचित तो तिचाच विचार सोडून देईल. हे होण्याची दाट शक्यता – नव्हे, खात्रीच दिसत होती. एवढी रिस्क घेण्याजोगी होती का ही गोष्ट?

त्या दोघांसोबत बसूनही ती आपल्याच विचारात गढली होती. सोडूनच द्यावा हा विचार, तिने मनाशी ठरवले. पण .... हे पटत नव्हते, एक टोचणी तिला स्वस्थ बसू देत नव्हती. हे सगळं विसरून त्याच्याशी संसार थाटला तरी तिला त्याच्या ह्या वागण्याची आठवण डाचत नाही का राहणार? मुळात अश्या तरूणाशी ती संसार, लग्न करूच शकेल का? त्या दोघांच्या इतर सर्व गोष्टी जरी पूर्णपणे जुळल्या तरी त्याने केलेली ही गोष्ट ती कधी विसरू शकेल का? ती आतल्या आत अधिकाधिक गंभीर होत गेली. तिने हे काय भलतंच उकरून काढलं होतं? पण आता

पाठी फिरणं शक्य नव्हतं. काय करायचं ते त्याचं तो ठरवेल म्हणून दुर्लक्ष करून त्याच्याशी लग्न करणं म्हणजे एक खोटं सह-जीवन जगणं असंच होईल. ते आता शक्य नव्हतं. काय तो सोक्षमोक्ष होऊन जाऊ दे.

कसं समजावावं त्याला? तिचं त्यांच्या बोलण्याकडे लक्ष गेलं, दोघेही एकमेकांना कॉलेजातील मैत्रिणींवरून चिडवत होते..... काहीतरी तिच्या मनात चमकलं! “तुला माहीतीये श्रेया, मी हे अर्जुनलासुध्दा नाही सांगितलय.....” तिला निरवचे शब्द आठवले. बस्स, तिने ठरवलं. मागचापुढचा जराही विचार केला नाही.

तेवढ्यात निरव बर्फ आणण्यासाठी उठून आत गेला, त्या संधीचा फायदा घेऊन श्रेया म्हणाली, “तुला एक मोठ्ठी गंमत माहीत आहे? निरवची? .... त्याने नुकतच सीए पूर्ण केलं होतं ना, तेव्हा.... तुला ती अजंता ठाऊक आहे? धनाढ्य बापाची लेक नि प्रसिध्द मॉडेलही? ...” तोवर आतून निरव ओरडलाच, “ए, काय....?”

तरीही श्रेया मस्करी करून चिडवत राहावं तशी बोलत राहिली, “अरे, निरवने तिला प्रपोज केलं होतं, माहितीये? आणि तिने तर साफ धुडकावून लावलं! म्हणाली अवंतिकाचा भाचा म्हणून तुला समोर उभं तरी केलं, नाहीतर तू कोण रे?” निरव वेगाने आतून बाहेर आला, “श्रेया!” संतापाने लाल होऊन थरथर कापत तो जवळजवळ किंचाळलाच, “हाऊ डेअर यू!! तुला विश्वासानं सांगितलं तर तू....तू...! तुला थट्टा सुचतेय??”

“अरे काय झालं निरव?” ती हसत समजावणीच्या सुरात म्हणाली, “अर्जुनच तर आहे ना? तूच म्हणतोस तो मला सख्ख्या भावाहून जवळचा आहे. मग काय झालं त्याला सांगितलं तर? तो थोडीच जगभर बोभाटा करणार आहे?”

“अरे हो, निरव, भडकू नकोस रे. मी कुणाला काही बोलणार नाही. बस्स?” अर्जुननेही त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला. पण त्याच्याकडे न बघताच निरव म्हणाला, “तू यामध्ये पडू नकोस अर्जुन. हे फक्त आमच्या दोघांत आहे….. तू…तू इतकी असंवेदनशील निघशील असं वाटलं नव्हतं श्रेया. कुठल्या एक हळव्या क्षणी बोलून गेलो तुझ्याकडे आणि तू ! विश्वासघातकी! दगा दिलास….” तो भडकून बोलतच राहिला. अर्जुनची थोडी कुचंबणा झाल्यासारखी वाटले, त्या दोघांच्या या खाजगी बोलाचालीत त्याने राहावे का जावे त्याला न कळून त्याने गोंधळून श्रेयाकडे पाहिले. श्रेयाने आश्वासक नजरेने त्याच्याकडे पाहून जायला हरकत नाही असे सुचवले. तो हळूच निघून गेला तरीही निरवच्या ध्यानात नाही आले, तो संतापाने बोलतच राहिला. “….मोठी घोडचूक केली तुला सांगून. माझी पर्सनल बाब आहे ती, मला कोणालाही कळू द्यायचं नव्हतं, अर्जुनलाही नाही. तू असं कसं करू शकतेस? काहीच कसं वाटलं नाही तुला?....मुळात,तुला कोणी अधिकार दिला माझ्या गोष्टी कोणालाही सांगण्याचा? ……”

“निरव, मला त्यानेच हा अधिकार दिला ज्याने तुला तुझ्या मावशीचं जीवन चव्हाट्यावर आणण्याचा अधिकार दिला….” ती थंड आवाजात, शांत व स्पष्टपणे बोलली.

“तू…अ? ओह!! म्हणजे …तू काय मला धडा वगैरे शिकवतेयस की काय?” तो गुरकावूनच बोलला. पण त्याने नजर चुकवली, त्याच्या आवाजात तोच जोम नव्हता आता, स्पष्ट दिसत होतं की तो चांगलाच चमकला होता.

“निरव, अरे अर्जुनला तर कळलंही नाही कि या एवढ्या गोष्टीचा एखादा बॉंबस्फोट व्हावा इतका उद्रेक का झाला? तरुणतरुणींमध्ये अश्या गोष्टी काही नवीन

नाहीत, तरीही तू इतकी स्फोटक प्रतिक्रिया दिलीस, तो कुणालाही सांगणार नाही हे तुला पक्क माहीत असूनही.... मग तुझ्या मावशीचं तर संपूर्ण जीवनच तू...."

त्याने तिच्याकडे पाठ फिरवून एक हात वर करून तिला थोपवले. "श्रेया, मला वाटतं तू आता निघावस. मला जरा एकट्याला राहू दे...." त्याच्या पूर्ण देहबोलीतच अचानक बदल आला होता. खांदे ... आणि स्वरही पडला होता. "मला थोडा विचार करायचा आहे..."

श्रेयाने एक दीर्घ निःश्वास टाकला. तिने तिचं सर्वस्व पणाला लावलं होतं, सर्वच हरायची भीती होती. पण ...पण ती जिंकली. "मी उद्या येते, निरव," त्याच्या पाठमो ऱ्या खांद्यावर प्रेमाने थोपटत ती जायला वळली नि हलकेच हसली, "फ्रीजमध्ये तुझ्या आवडीचं पुडिंग ठेवलयं रे, खायला विसरू नकोस हं....."

# गोष्ट एकल्या मैनेची ...

गोष्टी या नेहमी राघू-मैनेच्या असतात, होय ना? पण ही कहाणी मात्र आहे एकल्या मैनेची...

या खेपेस अलिकडेच बांधलेल्या गावच्या घरी मी परतले तेव्हा बाजूच्या रिकाम्या प्लॉटवर बांधकामाच्या हालचाली सुरू झालेल्या दिसल्या. चला, या वैराण माळरानावरती शेजार मिळणार या कल्पनेने मी आनंदले. आम्हाला प्लॉट विकतांना तेथे लहान-मोठ्या घरांची वसाहत उभी राहणार असं चित्र दाखवलं होतं. पण चार-पाच वर्षे झाली तरी फक्त आमचं एकांड घरच त्या माळरानावर उभं होतं. त्याने फारसा फरक पडत नव्हता, कारण आम्ही तरी कुठे नियमित राहायचो तिथे? ह्यांच्या बदलीच्या नोकरीतून वेळ मिळेल तेव्हा मी महिना-दोन महिने राहून वाळवी लागली नाहीना, उंदीर-घुशींनी उच्छाद मांडला नाही ना, एवढे पहात होते.

कामं संपवून मी अंगणातल्या झोपाळ्यावर पुस्तक वाचत बसे. त्या घराचे मालक कधी दिसले नाहीत, मजूर गवंडीच असत. त्यातल्या बऱ्याचश्या बाया-बाप्यांनी आमच्या घराचंही काम केलं होतं,त्यामुळे ती गावातलीच मंडळी मला ओळखत होती. त्या बाया कधी दुपारी भाकरीबरोबर लोणचं नाहीतर असलं तर तोंडीलावणं विचारायला येत आणि भाकर खाताखाता माझी चौकशी करायच्या, स्वतःच्या गोष्टी सांगायच्या.

त्या मजूरांमध्ये मला दोन चेहरे नवीन वाटले. एक खोकणारा, धडपडत कसेबसे काम करणारा म्हातारा आणि त्याच्याबरोबरची उमलत्या बांध्याची एकोणीस-वीसची तरूणी. ते बाकीच्यांत मिसळत नसत ना बाकी मजूर त्यांच्याशी फारसं बोलत. त्यामुळे मला त्यांच्याबद्दल कुतुहल वाटू लागलं. कोण होती ती दोघं? बाप-लेक, का सासरा-सून? पोरीच्या कपाळावर मोठं गोल कुंकू होतं, दुरूनही गळयातली ठसठशीत काळी पोत स्पष्ट दिसत होती. मग तिचा नवरा का येत नव्हता कामावर..?

माझी त्या दोघांपाठी जाणारी नजर पाहून बाकीच्या बाया म्हणाल्या, "त्ये आपल्यातलं न्हाय, आपल्या गावचं बी न्हाय.... पार नाल्यापल्याडच्या वस्तीतून येत्यात. आमी कुनी काय बोलाया जात न्हाय..." म्हणजे तुम्हीही त्यांची विचारपूस करायची जरूरी नाही, अश्या सुरात त्यांनी मला समजावलं.

आमच्या फाटकाच्या आत त्यातल्या दोनचार बाया येऊन बसल्या की ती दोघं दुरून आमच्या अंगणाकडे बघत राहात. कोणी मजूर आसपास नाही पाहून म्हातारा नि ती मुलगी कुंपणापर्यंत येऊन उभे राहिले, जरा भीड चेपल्यावर अडखळत उलीसं लोणचं नायतर कांदा मागितला. मी लोणचं कांदा देतांना प्रथमच त्या मुलीला इतक्या जवळून पाहिलं – आणि पाहातच राहिले. रंगाने जरा सावळी होती. काळीच असती तर पाषाणात कोरलेली लेण्यातली मूर्तीच वाटली असती. चापूनचोपून नेसलेल्या गुडघ्यापर्यंत वर खोचलेल्या काष्ट्याच्या लुगड्यातून घोटीव बांधा अधिकच उठून दिसत होता. चेहरा उभट, पण गालांनी असा काही गोल गोडवा दिला होता कि पाहातच राहावं. टपोरे डोळे, तरतरीत नाक, हनुवटीवर गोंदण, नाजूक जिवणी... अगदी कुठल्याही अप्सरेच्या वर्णनाबर हुकूम सारं काही तिच्यात होतं.

रंग गोरा असता, तर हेच सौंदर्य खरंतर भगभगीत दिसलं असतं. सावळ्या रंगामुळे एक मंद छटा लाभली होती नि ते रूप अधिकच खुलून दिसत होतं.

माझं असं तिच्याकडे बघणं लक्षात येऊन त्या दोघांनी अस्वस्थपणे चुळबूळ केली. झाडाच्या सावलीत भाकर खाताखाता माझं मुलीबद्दलचं कुतुहल जाणून म्हातारा म्हणाला, “माजी ल्येक. काळी हाय न्हवं, म्हणून तिच्या आयेनं नाव ठिवलं मायना.”

“तुम्हाला गावात कधी पाहिलं नव्हतं....” मी बोलायचं म्हणून बोलले.

“आमी दुरून येतो...त्या नाल्यापल्याड हाये आमचा पाडा,” म्हातारा म्हणाला, “थितं काय काम गावत न्हाय, शेती जिमीन बी न्हाय, तवा काम सोदत हिथं यावं लागतं...”

मनात प्रश्न बरेच होते, पण ते मी माझ्याकडेच ठेवले. हळुहळु त्या दोघांचा संकोच कमी होत गेला. जेव्हा दुसऱ्या बाया नसतील तेव्हा आमच्या फाटकालगतच्या झाडाखाली भाकरी खायला बसू लागले. ती मुलगी सहसा काही बोलत नसे, बोलायचं काम म्हातारा करी. तसं पाहिलं तर तो काही दुरून बाटत होता तेवढा जख्ख म्हातारा नव्हता, विड्या फुंकून झालेल्या खोकल्याच्या आजाराने त्याला वयाआधीच म्हातारा केलं होतं.

तो स्वतःहून आपली, खरंतर मुलीची कहाणी सांगायचा, आईविना लेक कशी मोठी केली, कशी जपली.... तिच्या नवऱ्याबद्दल जाणून घेण्याची उत्सुकता होती, म्हातारबाबा सांगेलच ही खात्रीही होती. एके दिवशी भाकरी ओली करायला थोडी डाळही मिळाली तशी पूर्ण जेवणाची सुट्टी झाडाखाली बसून बोलत राहिला.

“इची लगिनाची उमर जाली तशी चार बरी घरं शोदाया सुरुवात केली. योक जुन्या वळखीचा व्हता, दुसऱ्या गावचा शेतजिमिनवाला…त्येचा भाचा मुंबैला बागच्या कामाला हाय म्हनाला. तसा बरा वाटला, लगीन लावून दिलं. म्हयना दोन म्हुनं त्याच्या मामाच्या घरातच नांदली दोगं, मंग ग्येला मुंबैला परतून, तितं खोली लय म्हाग, मंग हिचं समदं दागिनं नेलं, म्या जिमिनीचा व्हता त्यो तुकडा इकून पैकं दिलं, पोरीला घर व्हयील म्हुन……समदं घेऊन ग्यला तो ग्येलाच, काय पत्त्या न्हाय त्येचा…”

मी चमकून मैनेकडे बघितल. न परतलेल्या नवऱ्याच्या आठवणीने व्याकूळ झाली होती का आपल्याला, बापाला फसवून सगळं लुबाडून बेपत्ता झाला म्हणून चिडली होती याचा अंदाज घ्यायचा प्रयत्न केला. पण ती चेहऱ्यावर काही दिसू देत नव्हती. तिच्या त्या मोठ्या मोठ्या काळया डोळयात उद्विग्नता, मनाची जखम, परिस्थितीची किंवा सगळया जगाबद्दलची चीड असे संमिश्र भाव आट्यापाट्या खेळत होते. आपल्या आयुष्याची मळकी लक्तरं लोकांपुढे दाखवणं तिला पसंत नसावं, पण बापावर मायाही इतकी की लोकांसमोर त्याला चूप करायलाही तिचा जीव धजत नसावा.

माझ्या दारात त्या बापलेकीला दोन-तीनदा पाहिल्यावर बाकीच्या बाया मला सावध करू लागल्या, “बाई, फार तोंडाला लावू नगा बरं, लई चिकट मानसं. गळयात पडतील, पोरीला ठिवून घ्या म्हनल म्हातारा…”

आणि खरचं. थोड्या दिवसांनंतर म्हातारा म्हणालाच, “बाय, लय उपकार व्हतील गरिबावर. माज्या जीवाचा काय भरोसा न्हाय, आज हाय उद्या नसन म्या. ह्या लेकीचा घोर लागलाय जीवाला, माज्या मागारी कोन तिला? दुनिया लय खराब,

काय व्हईल तिचं. आसरा द्या बाय तुमच्याकडं, काय पडल त्ये काम करल…फकस्त तुमचा आदार मिळू द्ये….."

पण मी कशी ठेऊन घेणार तिला, माझी खरच अडचण होती, मी काही कायमची इथे राहात नाही, नवऱ्याची बदलीची नोकरी, मलाच एका जागी थारा नाही, तिला कुठे ठेवणार? "त्यापेक्षा हे घरबांधणीचं काम करताय, त्या मालकांना लागेल ना कुणीतरी घरकामाला…ते येतच असतील ना अधे मधे…"

"येत्यात, पन त्यो मानूस असा काय बगतो प्वारीकडे, की मालकिनीनं श्याप सांगून ठिवलय, मालक येत्यात तवा हिला कामावरबी यिऊ देऊ नगा…." आता काय बोलनार?

"पण तुम्ही तिच्या नवऱ्याचा शोध का नाही घेत?" मी विचारले, "त्याच्या नातेवाईकांना विचारा. का ग मैने, तुला कधी चिठ्ठी-पत्र आलं त्याचं? त्यावर पत्ता मिळेल.."

"नाय बाय, कंदी योक चिठोरं बी नाय धाडलं…" मैना विचारलं तरच बोलायची.

"सोद घ्येतला की आमी," म्हातारा बोलला, "मंग म्या प्वारीला त्या मामाच्या घरीच नेऊन घातली, म्हनलं भाच्याला म्हनावं घिऊन जा न्हाय तर तुमी सोताच सांबाला हिला. तर आटपंदरा दिसात त्येच्या सुनेनं मागारी आनून सोडली, ह्यो इस्तू नगं म्हनं माज्या घरात, माजा दादला हिच्याच मागंमागं करतू….."

मी मैनेकडे बघितलं, ती नजर चुकवून दुसरीकडे बघत पुटपुटली, "म्या काय नाय केलं, म्या मामीसंगट चुलीशीच बसाची."

या तिच्या कमनशिबाच्या कहाणीला बाकी बाया अजून मीठमसाला लावायच्या, “त्ये काय इच्यारू नगा. न्हवऱ्याकडं जाती म्हून चार आठ दिस काय जाणं कुनासंगट फिरून आली. उगा न्हाय न्हवऱ्यानं टाकली, हिची ही थेरं….”

हे मी नवीनच ऐकत होते, म्हातारबाबा कसं काय बोलले नव्हते? हे खरं होतं का खोटं? पण जास्त विचारून त्यांच्या मामल्यात नाक खुपसायची मला इच्छा नव्हती.

एक दिवशी बाबा म्हणाला, “लय वैताग आला न योक दिशी त्येच्या मामाला म्हनलं तुज्या भाच्याला म्हनावं घेऊन जा नांदाया नायतर पंचांपुढं गाऱ्हानं ठिवीन…व्हतं नव्हतं त्ये पार खर्चून समद्या पाड्याला ज्यावान घाटलं लगीनाचं, समदं साकशीला हाय… पंच बशिवतो म्हनल्यावर त्या मामानं त्येला काय लिवलं काय जानं, त्यो न्हाय आला पर आपल्या खाशा दोसदाराला पाटीवलं हिला गेऊन जायाला. मी काय कुनासंग बी धाडनार? पन चिटी लिवून दिली व्हती कि माजाच मानूस हाय, तं धाडली. तर वाटंत येका ठेसनात उतरवून कुनासंग सौदा करत व्हता म्हंनं, हिनं पाटून ऐकलं, नि मागल्या मागं पलाली, कशी घरला आली द्येव जानं…”

मी दचकून मैनेकडे पहात विचारलं, “काय गं…..?” “व्हय जी,” ती हातानं पदराचा बोळा करत म्हणाली, “गाववालं कायबाय बोलत्यात, कि म्या कुटं व्हते नि काय केलं….पन थितून कशीतरी सुटली, लपून लपून ऱ्हायली. घरी याचं कसं त्येबी कुटं ठअवं व्हतं? बायामानसांना इच्यारत इच्यारत आले कसं बी करून…”

“अरे देवा…” मी उद्गारले, “पण ही दिसायला इतकी सुंदर मग नवरा नेत का नाही नांदायला…?”

“काय ठावं,” मैनाच म्हणाली, “माज्यासारक्या धा जनींशी लगीन लावून, समद्यांबरोबर म्हयना दोन म्हयनं ऱ्हाऊन नि पैकं लुबाडून त्यो शेरात चंगळ करत अस्येल.....”

“मग बाबा, तुम्ही हिचं गावातच राहणाऱ्या कुणा शेतमजूराबरोबर लग्न का लावून देत नाही?” मी विचारले

“कोन येनार फुडं हात धराया?” मैनाच परखडपणे म्हणाली, “बगून जिबल्या चाटाया समदं तैय्यार, अशीच मज्जा कराया समदं धावून येत्याल, पन पाट लावाची हिम्मत न्हाय. समद्यास्नी भ्या कि त्यो न्हवरा परतल नि खटलं उबं करल...”

मैनेसाठी आयुष्य इकडे आड तिकडे विहिर झालं होतं. नवरा सोनंनाणं, पैसा घेऊन फरार, घरात खायला दाणा नाही, कमावायला बाहेर पडलं तर पुरुषांच्या नजरा फाडून खायला तयार. त्यामुळे अंगात बळ नसतांनाही तिच्या बापाला तिच्या सोबतीला कामावर ये जा करायला लागत होतं.

एका दुपारी जेवणाची वेळ होऊन गेल्यावर एकटी मैनाच अंगणात येऊन उभी राहिली. “तू एकटीच?” मी गोंधळुन विचारलं.

“व्हय जी, बा बी संग हाय,” ती चाचरत गोंधळत बोलली, “आल्याधरनं त्येचा जीव बरा न्हाय, थतच झोपून पडलाय,” ती बांधकामापलीकडे हात दाखवत म्हणाली, “त्येला काय व्हतय काय न्हाय म्हून म्या पन त्येच्या बरुबरच बसून ऱ्हायलं न्हवं, काय बी काम झालं न्हाय आज. आता धरून धरून घरला न्हेईन, पर...मजूरी न्हाय गावाची आजला..... बाय, पायलीभर भाकरीचं पीठ मिलल का...” तिने खाली मान घालून पुटपुटत विचारले. मी आतून पीठ आणेपर्यंत ती पायरीवर डोकं

हातात धरून बसली, मला पाहून पटकन उठली, "लय उपकार...मागून घ्येयाला बरं वाटत न्हाय...बाला उठून कामाला येयाला व्हत न्हाय नि मला येकलीला धाडायाबी व्हत न्हाय...म्या त्येच्या जीवाचं वझं व्हवून बसलया. आस्पितळात घालाया व्हवं, पर घरी म्या एकली ऱ्हाईन म्हून विलाज बी करून न्हाय घ्येत..."

"तुझे कुणी नातलग असतील ना, दोन-चार दिवस जाऊन रहाण्यासारखे..." मी तरी अजून काय सुचवणार?

"आयची योक भन हाय, बा तिच्याकडं घेऊन ग्येला व्हता, पर ती म्हनतीया, तरनी प्वार, कोन जिम्मा घेनार? ह्ये रुप नि जवानीच वैरी झालया माजं, कुटं थारा मिलना....."

मी सुन्न होऊन विचार करत राहिले. पुढे दोन-चार दिवस दोघंही कामावर दिसले नाहीत. म्हाताऱ्याला बरं नसेल, पण मग ते खाणार काय? पण तोवर माझ्या घरच्यांचे निरोपावर निरोप य़ेऊ लागले, तेव्हा गावचा मुक्काम आटोपता घेऊन मी शहराचा रस्ता धरला. बरीच कामं निघाली होती, मी सर्व गडबडीत व्यस्त होऊन गेले, पण मैनेचा विचार मधूनच मनात डोकावी. मी तिची मदत करायला हवी होती का? पण सगळ्या बदलीच्या गावी ऐसपैस घरं मिळतातच असं नाही. मुलाला त्याच्या पहिल्या नोकरीच्या जागी घर लावून द्यायला गेले, तिथे तर बॅचलरची एवढीशी जागा. तोवर मोठीला कावीळ झाली, तिची मुलगी लहान, मग तिथे धावले. मैनेला सगळीकडे नेणं कसं शक्य होतं? मी मनाला पटवत राहिले.

घरची सर्व कामं निपटेपर्यंत पावसाळा सुरू झाला. तेव्हा गावी जाणं मागेच पडत गेलं. पण खूप भारी पाऊस जरा ओसरल्यावर गावच्या घरी कुठे गळत नाही ना, सामान खराब झालं नाही ना, हे पहायला आठ-पंधरा दिवस तरी जाणे जरुरी

होतं. बाजूच्या बंगल्याचं काम जवळ जवळ पूर्ण झालं होतं, कुंपणाची भिंत बांधणं चालू होतं. कामं आटोपून मी व्हरांड्यात खुर्ची टाकून बसले. काम करणाऱ्या मजूरांत म्हातारबाबा किंवा मैना दोघेही दिसले नाहीत.

माझ्या मनाला चुटपूट लागून राहिली, कुठे गेली असतील दोघे? ते काही गजबजलेलं शहर नव्हतं कि एकावेळी दहा ठिकाणी कामं चालू असतील. मग काम नाही तर खाणार काय ती दोघं? जेवणाच्या सुट्टीत जुन्या बायांना बोलावून विचारिन असं म्हणे पर्यंत दुरून मैना स्वतःच येतांना दिसली. खरंतर मी ओळखलच नाही, तीच फाटकापाशी थांबून हसली तेव्हा लक्षात आलं....घोळदार सहावारी लुगडं, डोकीवरून पदर, हातभर काकंणं, नि हातात स्टीलचा जेवणाचा डबा.

“मैना? अगं येना...” मी बोलावलं. “आत्ता येते......” म्हणत ती बाजूच्या बांधकामात गडप झाली, नि पाच-दहा मिनिटांत हात हलवत येऊन पायरीवर बसली. “बाबाला डबा देऊन आलीस?” मी विचारलं.

“न्हाय जी, धन्यास्नी....” म्हणत ती तोंडभर हसली.

“म्हणजे? तुझा नवरा आला का माघारी? बरं झालं....” मी समाधानाने म्हंटलं.

“त्यो मुडदा कसला येतुया?” त्याच्या नावाने बोटं मोडत मैना म्हणाली, “त्यो न्हाय, आमचं नवं घरधनी, पाट लावला न्हवं...”

“कुणाशी??” मी आश्चर्यचकित.

“ह्ये मुकादमच न्हवं का....” ती लाजून हसली आणि मला हसावं का रडावं ते कळेना. “अगं पण....” काय बोलावं ते न कळून मी अडखळले, “तो...तो तर

तुझ्या बाबाहून वयाने थोडाच कमी असेल, दोन मुलीही आहेत म्हणे, बायको मेली....”

“समदं ठावं हाय की...” मैना ठसक्यात म्हणाली, “पन कायतरी ठरवनं जरूरी व्हतं, समदा इच्यार क्येला. अजून तरी काय करनार सांगा. बाबा पार ट्येकला व्हता. सकाळी हातरूनातून उटाया बी व्हत नव्हतं, तरी मला येकलीला कामावर कसं घाडाचं म्हनून खुरडत खुरडत, वाटेत धादा पडत झडत माज्यासंग यून बसाचा. रोज रडाचा, माजं काय खरं न्हाय प्वारी, कवाबी राम म्हनंन, मंग तुजं कसं व्हाचं? त्येचं तडफडनं माला बगाया व्हत नव्हतं. तरने ताटे मर्द समदे मागंफुडं लाळ गाळाया, जलमभरासाटी हात धराची हिम्मत न्हाय कोनात. इच्यार क्येला नि योक दिस सीधी मुकादमासमूर हुबी ऱ्हायली, न्हेमी टुकूर टुकूर बगत ऱ्हातू, इच्यार काय हाय? तसा पयलं त्ये गडबडलं, म्या म्हंनलं, नुसती चाखून थूंकून टाकाचा इच्यार हाय का पाट लावाची हाय हिम्मत? तशी गडी तैय्यार जाला की! आता माला काय नाय दिक्कत...”

“म्हणजे त्याच्या पैशासाठी पाट लावालास तू?” मी सरळच टोकलं.

“समदं गाव त्येच म्हनतं, म्हनो. पन तुमी तरी आसं नगा म्हनू,” ती दुखावलेल्या स्वरात बोलली, “म्या सांगिटलं न्हवं, बाचा तरास बगाया हुत न्हवता, नि माला थारा द्याया कोनबी तैय्यार न्हवता. ह्ये मालक मोट्या वयाचं असत्याल पर माला वापरून फेकाची वस्तू न्हाय समजले, घरची मालकीन म्हून घेवून गेलं. आन म्या पैक्याला हात बी न्हाय लावला. पोरींच्या मामा, आज्यांला बलावून त्यांच्याम्होरं पैकं ब्यांकत दोगींच्या नावावर बंद खात्यात ठिवलं, म्होरं माज्या नशिबात असल

त्ये मिलल, त्येबी पोरींसंगट मिलून खावू. म्या फकस्त आदार शोदला आनि बासाटी आस्पितळात विलाज चालू क्येला....”

“अगं पण माणूस बरा आहे का? मी ऐकलं की नजर वाईट आहे, म्हणून बायकोने पण जीव दिला....तुझ्याकडेही पहात राहायचा म्हणालीस ना...”

“पोरी म्हनत्यात त्येनी जीव न्हाय दिला, गॅश शिलिंडर फुटलं म्हनं. आदी माज्याकडइ बगत व्हतं म्हनाले, तसं समदेच मरद वंगाळ नदरेनं बगत्यात, पन पाट लावाची हिम्मत हाय कुनाची...”

“अन् तू म्हणायचीस तुझा पहिला नवरा परतेल म्हणून सगळे लग्नाला घाबरायचे, आता तो आला तर....”

“धनी म्हनत्यात आलाच त्यो तर तवा बगून घिऊ,” ती कौतुकाने म्हणाली,

“हं......म्हणजे शेवटी तू स्वतः पुढे होऊन...”

“त्यो माजा निलाजरेपना वाटला असल न्हवं तुमाला? पन बाय, जलमभरासाटी लाज – आबरू गमावून बसन्यापरीस योक डावच निलाजरं बननं परवडलं, न्हवं?”

मी मनात शरमले. आत्ताच्या मुली स्वतःहून मुलांना प्रपोज करतात तर आपण त्यांच्या धिटाईचं कौतुक करतो, मग हिने तर पुढे होऊन आपल्या आयुष्याचा रक्षणकर्ता मिळवला त्यासाठी मी असं कसं म्हणू शकते?

“कराया लागलं बाय, कराया लागलं...पन माला काय बी पश्चेत्ताप न्हाय बरं....” असं म्हणत ती उठली नि बांधकामाकडे गेली. तर असा एकल्या मैनेने धीटपणे, जरा विजोड का होईना पण, आपला राघू मिळवला.

# पडछाया

"अरे निशांत, मी ऐकलं ते खरं का रे? अरे हे आत्मघातकी विचार कधी यायला लागले तुझ्या मनात, अं?" किरीटने अर्धवट थट्टेने, अर्धवट गंभीरतेने विचारले. निशांतने उद्वेगाने आपल्या आधीच विस्कटलेल्या केसांतून हात फिरवला, "ए बाबा, आठवणही नको करून देऊस रे ....."

"अरे, पण मग का हा निर्णय घेतलास? कारण काय?" किरीटनेही आता जरा हैराण स्वरात विचारले, "आपण किती महत्वाकांक्षेने हे नाटक हाती घेतलं. आणि तुला कोणी तरी अडगळीत कोळीष्टकांनी वेढलेली म्हातारीच – सॉरी, प्रौढाच— भेटली का? अरे आईचा रोलही महत्वाचा आहे त्यात......"

"मला माहित नाही का ते?" निशांत खरोखरच वैतागला होता, "अरे, त्यांनी निरोप पाठवला – नात का बाजूची कोणी होती—बाबांच्या बरोबर त्यांनी काम केलं होतं त्याची आठवण वगैरे करून दिली....."

"अरे पण भिसेकाकांनी हजारोंबरोबर काम केलं, सगळेच येतील आठवणी सांगत तर तू काय आपल्या हाताने पायावर धोंडा पाडून घेणार आहेस?" किरीटच्या बोलण्यावर निशांत काही न बोलता मान हलवत राहिला. तेव्हा किरीटच पुढे

म्हणाला, "पूर्ण विचार तरी केलास का? एक नाही, किती अडचणी आहेत त्यात. एक तर आजकाल त्यांचं नावही फारसं कोणी ऐकलं नसेल. कास्टला फक्त हिरोहिरॉईनमुळेच नाही वजन येत, लोकं बाकीची मंडळी कोण आहेत हेही पारखून घेतात. आणि काय रे, नाटकाचे प्रयोग काय फक्त मुंबईत, ते सुध्दा त्यांच्या घराजवळच होणार आहेत का? गावोगावचे दौरे करतांना आमची दमछाक होते, तर या बाई कश्या काय फिरतीवर येऊ शकणार, सांग?"

त्याने अडचणींचे पाढे वाचायला सुरूवात केली तशी निशांत अधिकाधिक विषण्ण होत गेला. किरीटचं बोलणं अजून पूर्ण झालं नव्हतं. "सीमाताईंबरोबर लेखी करार झाला नसेल, पण त्यांनाच या भूमिकेसाठी घ्यायचं ठरलं होतं ना? त्यांनाही ते माहित आहे. आता त्यांना डावललं तर चिडणार नाहीत त्या? आपल्या, सध्या चालू असलेल्या 'मांडवावरची वेल' मध्येही त्याच आहेत, त्यांना नाराज करून कसं चालेल? आणि, हे विसरलासच कां, आपल्या रोजच्या तालमींसाठी त्यांच्या घराइतकं मोठं आणि रिकामं घर कुठे मिळणार आहे? त्या नाटकात नसल्या तर काय आपल्याला घर असंच वापरू देतील?"

निशांतने मोठा उसासा टाकला. "काही तरी मार्ग तर काढायला लागणार," तो विचार करत म्हणाला, "असं केलं तर? कुमुदिनीबाईंना इथले प्रयोग देऊ आणि बाहेरगावच्या प्रयोगांना सीमाताईंना ....म्हणजे त्यांनाही नको वाटायला....."

"अरे माझ्या शहाण्या राजा," किरीट आता पुरता वैतागला होता. या खेपेस तो हक्काने बोलत होता कारण या त्यांच्या महत्वाकांक्षी नाटकाचा तो फक्त नायकच नव्हता तर निर्मितीतही भागीदार होता. "सीमाताई म्हणजे काय कुक्कुलं बाळ आहेत का एवढंही न समजायला? नाव, प्रसिद्धिचा मोठा वाटा मिळतो इथे....दौऱ्यांमध्ये श्रम जास्त....हे सगळं माहित असूनही त्या ऐकून घेतील का तुझी ही खुळी स्कीम?"

आणि झालंही तसंच! सीमाताई ऐकून घ्यायला तयारच नव्हत्या. "अरे काय हे निशांत! असं कधी झालयं कां?" निशांत त्यांच्याहून वयाने लहान होताच आणि त्याच्या वडिलांच्या दिग्दर्शनाखालीही सीमाताईंनी काम केलं होतं, त्यामुळे त्या बोलण्यात सूट घेऊ शकत होत्या. "आणि तू अशी अपेक्षा करतोस कि मी या प्रस्तावाला मान्यता द्यावी?"

"जरा समजून घ्या ना तुम्ही," निशांत अजीजीने म्हणाला, "मी ही जरा दुविध्यातच सापडलोय. त्यांना नाही कसं म्हणायचं या संकोचाने मी हो म्हणालो खरा, पण....तसं पाहिलं तर मला नाही वाटत त्या खरोखरच प्रयोगात काम करू शकतील. एक तर वय एवढं झालयं, पासष्ट तरी असतील. पुन्हा तालमींच्या तणावाची, मेहनतीची सवयही नाही राहिली," त्याच्या मते सीमाताईही पन्नास पंचावन्न पेक्षा कमी नव्हत्या, तेव्हा त्याने सीमाताईंनाच विचारले, "तुम्ही तर सातत्याने रिहर्सल्स, प्रयोग करत असता, सराव आहे. तरीसुध्दा ही सर्व धावपळ सहज शक्य नाही ना, दमायला तर होतच ना? त्यांनी तर कित्येक वर्षात ना तालमी

ना प्रयोग केलाय. कसं झेपेल त्यांच्या वयाला, तब्येतीला? थोड्या आठवड्यांतच स्वतःहूनच, मी नाही करू शकत, हेच म्हणतील. थोड्याच वेळाचा प्रश्न आहे ......"

"पण मुळात हा निरोप धाडलाच का त्यांनी?" आत्तापर्यंत गप्प राहिलेला किरीट जरा चिडूनच म्हणाला, त्याला त्याच्या प्रथम निर्मितीमध्ये कसलीही बाधा नको होती, "त्यांच्या काळात त्यांनी एवढ्या नाटकांचे केले तेवढे प्रयोग पुरेसे नाही झाले का त्यांना? अजून हौस बाकी आहे की काय?"

"तसं नाही रे...." बोलावं कि नाही अश्या दबल्या आवाजात निशांत म्हणाला, "मला वाटतं त्यांची आर्थिक अडचण असावी."

"हं, असेल. त्यांना मूलबाळ, मागेपुढे कोणी नाही," सीमाताईंनी पुस्ती जोडली.

"ठीक आहे ना मग," किरीट्पाशी उपाय तयार होता, "प्रयोगाच्यावेळी त्यांच्या नावाने पेटी फिरवू या प्रेक्षकांमध्ये. त्यांची आठवण ठेवणारे अजूनही असतील. भरपूर जमतील ......" सीमाताई एकदम स्तब्ध झाल्यासारख्या वाटल्या. निशांत मान हलवत म्हणाला, "तसं नाही करता येत ..... त्या घेणारही नाहीत...."

असं सगळंच त्रिशंकू होऊन राहिलं होतं. हो ना करता करता तालमींना सुरूवात झाली. सीमाताईंना सगळ्यांनी सांगून समजावून कसंबसं तयार केलं होतं.

त्यामुळे त्याही हजर असत. तालमींसाठी आपलं घर मिळावं यासाठी सर्व आपल्याला इतकं राजी करताहेत असं त्यांना वाटलं असलं तरी त्यांनी तसं दाखवलं नाही.

पहिल्याच दिवशी कुमुदिनीबाईंनी तालमीला आल्यावर प्रथम स्वतःची ओळख करून दिली. "तुमच्यातले बरेच मला ओळखतही नसतील. मी जेव्हा स्टेजवर काम करत होते तेव्हा तुमच्यातले अर्धेअधिक जन्मलेदेखील नसतील. हा निशांत तर एवढासा होता," त्यांचे एवढे बोलून होईपर्यंतच सर्वांच्या चेहऱ्यावर कंटाळा दिसत होता. "म्हणून ओळख करून देण्याची गरज आहे. मी कुमुदिनी, पण सगळे मला माईच म्हणतात. तुम्हीही म्हणा – कारण आता आपण सगळे मिळून एका मोठ्या कुटुंबासारखेच, होय कि नाही?" नायिकेची भूमिका करणाऱ्या रम्याने तर ह्यावर डोळेच वर फिरवले.

माई पासष्ट वर्षांच्या होत्या, तेवढं वय दिसतही होतं. पण वयामुळे आपण कुठल्याही कामात संथ किंवा पाठी पडलोय असं वाटू न देण्याची त्या काळजी घेत होत्या. वयानुसार आणि आता जास्त लक्ष न दिल्यामुळे शरीर जरा सुटल्यासारखे झाले होते. विरळ होत चाललेले केस रंगवून काळे केले होते, पण त्याने वय लपत नव्हते. एके काळी सुंदर असावा अशी लक्षणे दाखवणारा चेहरा आता ओढलेला, डोळे थकलेले दिसत होते. पण तरीही त्या प्रत्येक कामात उत्साह दाखवत होत्या आणि त्याने सगळी मंडळी अजूनच वैतागत होती.

माईंचं घर तालमीच्या जागेपासून, म्हणजे सीमाताईंच्या घरापासून फारसं दूर नव्हतं. त्यामुळे त्या एकट्या रिक्षानेही येऊ शकत. पण जर का सर्वच आपापल्या कामानिमित्ताने शहराच्या दुसऱ्या टोकाला असतील आणि म्हणून रिहर्सलही तिथेच कुठे केली गेली, तर मात्र त्यांच्या येण्याचा प्रश्नच नसे. किरीटला तेवढे कारणही पुरे, "अश्या कधी तालमी होतात का? कोणा एकाच्या सोयीप्रमाणे ......खरं सांगायचं तर, म्हणजे त्यांच्याच भल्यासाठी म्हणतोय मी, त्यांच्यासाठी सिनेमाच उत्तम राहिल. त्यात महिना महिना तालमी नाहीत, प्रयोगांसाठी प्रत्यक्ष उभं राहायचं नाही. त्यांच्या सोयीनुसार शूटींग करता येईल. दमायला झालं, तब्येत ठीक नसेल, तर बसता येईल थोडा वेळ, तोवर दुसऱ्यांचे शॉट्स घेता येतात. सिनेमाच बरा त्यांच्यासाठी." त्याच्या ह्या बोलण्यात काही खोट नव्हती, त्यामुळे निशांत म्हणाला, "तू म्हणतोस ते खरं, पण सिनेमा क्षेत्रात काही त्यांची ओळख नाही. जे काही काम केलं ते स्टेजवरच....घेऊ सांभाळून जसं जमेल तसं."पण किरीट जराही जमवून घ्यायला तयार नव्हता. माई त्याच्याच आईची भूमिका करणार होत्या आणि किरीटचं वागणं असंच राहिलं तर कसं होणार याची निशांतला चिंता लागली होती.

तसे सर्वच जरा कंटाळले होते. तालमीच्या वेळी माईंनी, आमच्या वेळी ना हे असं होतं, वगैरे काही सुरू केलं कि सगळे 'ओह नो!' म्हणून कपाळाला हात मारायचं तेवढं बाकी ठेवत होते. कधी त्यांच्या लक्षात आलेच तर, 'तुम्हा लोकांना काही नवीन आयडीयाज मिळू शकतील, म्हणून सांगत होते,' असं काहीसं पुटपुट्त गप्प होत. सवय नसल्याने त्या नक्कीच दमत असणार, पण तरीही खालचा ओठ

दाताखाली दाबत, प्रत्येक सीनसाठी उठून उभ्या राहात. कामात कुठलीही कमी न होऊ देण्याची दक्षता घेत.

सर्वांनीच गृहीत धरलं होतं कि माई फार काळ एवढी मेहनत करू शकणार नाहीत. पण तरीही त्या नेमाने येत राहिल्या, तेव्हा मात्र सर्वांचा धीर संपत आला. बारीक सारीक वागण्यातूनही इथे तिथे नाराजी प्रकट होऊ लागली.

त्या दिवशी मात्र एरवीच्या थंड प्रकृतीच्या निशांतच्या चेहऱ्यावरचा उत्साह पाहूनच उमगत होता. "सुटलो, आपण सगळेच सुटलो!" त्याने सर्वांनाच उद्देशून घोषणा केली, "माईंचा फोन आला होता, त्या येऊ शकत नाहीत म्हणून .....आज नाही आणि यापुढेही नाही --" सगळयांनी एकत्रित सुटकेचा निश्वास टाकला. आता सर्व काही ठीक होतं.

"त ....तुम्ही इथे कशा?" सीमाताईंना आपल्या दारात पाहून माई थक्कच झाल्या. सीमाताई फक्त हसल्या. माईंना त्यांना आत बोलावायचंही भान राहिलं नाही. जुन्या पध्दतीच्या दिवाणखान्याकडे, सामानाकडे पाहात सीमाताई आत येऊन बसल्या. "मी इथे कशी विचारता? मी तुम्हाला न्यायला आले आहे – रिहर्सल्ससाठी."

"नाही, नाही!" माई इतक्या पट्कन बोलल्या कि त्यांनी जे बोलायचं त्याची आधीच तयारी करून ठेवलेली असावी. "मी नाही .....म्हणजे मी ....मला ह्या वयात आता जमणार नाही. होत नाही माझ्याच्यानं ......"

"काय सांगता! व्यवस्थित सगळं जमत होतं.....आणि तुम्हालाही ते माहित आहे." सीमाताई समजावत राहिल्या आणि माई नाही म्हणत राहिल्या. "नाटक – त्याच्या तालमी नि प्रयोग – सगळंच मेहनतीचं काम. पासष्ट वर्षांच्या म्हातारीला झेपण्यासारखं नाही. माझ्यासारखीनं सिनेमात काही मिळालं तर बघायला हवं – रीटेक घ्यायची सोय असते, मध्ये आरामही करता येणं शक्य असेल ....." आता सीमाताईंची खात्री पटली. त्यांना – आणि सर्वांनाच – शंका होती कि माईंबद्दल जे बोललं जातं ते त्यांच्या कानापर्यंत पोहोचत असावं. खरोखरच त्यांना ते कळत होतं, आणि तेच कारण होतं त्यांनी काम सोडण्याचं. पण सीमाताई बोलून दाखवू शकत नव्हत्या.

"तुम्हालाही माहित आहे माई, तुम्हीही हे अनुभवलं असणारच. एकदा स्टेजवर उभं राहिलं कि असतील नसतील त्या शरीराच्या व्याधी कुठच्या कुठे पळून जातात. स्टेजवर नारळ फुटला, लाईट्स लागले, अगरबत्त्यांचा सुगंध पसरला कि अंगात ताप आहे का दुखणं, तेही विसरायला होतं......."

सीमाताईंनी असं चित्र उभं केलं कि माईही क्षणभर स्तब्ध झाल्या. मग म्हणाल्या, "मला एक सांगा .....मला हे कळत नाही कि तुम्ही का इतका जोर

देताहात कि नाटकात मी परतून यावं? तुमचा काय फायदा त्यात? उलट तुमची भूमिका मी – हडपली, तुम्ही तर खुश व्हायला हवं मी हे काम सोडल्याने. म्हणून स्पष्टच विचारते, हा मला परत बोलावण्याचा दिखावा तुम्ही का करता आहात?"

माईंचा रागाने बोलण्याचा हेतू सफल झाला कारण त्यांचा शेवटचा प्रश्न सीमाताईंना झोंबला असावा असं दिसलं. तरीही त्या तसं न दाखवता क्षणभर गप्प राहिल्या. मग म्हणाल्या, "आहे, माझा खूप फायदा आहे," सीमाताई बोलल्या, "आता तुम्ही विचारलत म्हणून मी ही स्पष्टच सांगते – तसं पाहिलं तर आपली नाटकाची दुनिया म्हणजे सावल्यांचा खेळ असतो. मला .... तुमच्यामध्ये मला माझ्या भविष्याची पडछाया दिसते. माझीही आता प्रसिध्दीझोतात फारशी वर्षे शिल्लक राहिली नाहीत. हळू हळु काम – आणि उत्पन्नही कमी होत जात बंद होईल. तुम्ही जो आता धडपड करून स्वतःच्या पायावर उभं राहाण्याचा आत्मसन्मान दाखवत आहात, तो मला डोळ्यात, मनात साठवून ठेवायचा आहे. म्हणजे ....जेव्हा माझी पाळी येईल, तेव्हा मला ह्याच तुमच्या आठवणी असेच प्रयत्न करत राहण्याची हिम्मत देतील, धैर्य देतील. याची जरूरी भासेल मला, आता नाही तर थोड्या वर्षांनी ......"

"नाही, असं म्हणू नका," माई आवाजातला कंप लपवत म्हणाल्या, "माझ्यासारखी परिस्थिती कुणावरही न येवो. माझं नात्यागोत्याचं कुणी नाही – अर्चना आहे, पण खरतर ती माझी कुणी नाही. माझ्या जुन्या शेजाऱ्यांची मुलगी. पण पोरीनं इतका लळा लावला कि आईवडिल इथलं घर सोडून नवीन घरात गेले, तर

ही चार दिवसातच आपलं सामान बांधून परत आली आणि तेव्हापासून माझ्या घरातच राहिली. सगळे खर्च आपल्या पगाराने चालवीन म्हणते, पण मला नाही ते बरं वाटत. जेव्हा माझी सारी पुंजी संपली तेव्हा – हा पुन्हा काम शोधायचा खटाटोप केला. पण तुम्ही का पुढची चिंता करता? तुम्हाला तर स्वतःची मुलंबाळं आहेत ना?"

"एकच मुलगी आहे. लग्न होऊन परदेशात स्थायिक आहे. ती सांभाळेलही. पण मला ते नकोय. म्हणजे – जावयाचे उपकार कशाला घ्या, असं काही नाही. मुलगी असो वा मुलगा, जमेल तितकं आत्मनिर्भर राहाणंच पसंत करीन. पुढे नाईलाजाने पूर्ण अवलंबून राहावच लागलं तर काही करता येत नाही. पण जितकं होईल तितकं ….. म्हणून तुमच्याकडून हे शिकायचं आहे. तेव्हा तुम्ही परत येणार आहात!"

सीमाताईंनी जेव्हा निशांतला 'माई परत येणार' हे सांगितलं, तेव्हा त्याला हसावं का रडावं ते कळेना. "तुम्ही का त्यांना भरीस पाडून बोलावून घेतलत? चांगल्या गेल्या होत्या स्वतःहूनच. आता तुमचीच भूमिका जाईल…." तो वैतागून म्हणाला.

"माझी भूमिका हा माझा प्रश्न आहे ना? आणि तुला खरंच वाटतं कि त्या स्वतःहून गेल्या होत्या?" सीमाताईंनी टोकदार प्रश्न विचारला. त्याचं सरळ उत्तर न देता निशांत पुटपुटला, "पण आता सगळंच पुन्हा …." निशांतला त्याच्या

तालमींमध्ये, प्रयोगांमध्ये अस्थिरता नको होती. माईविषयीच्या नाराजीने अर्धेअधिक कलाकार मनमोकळा अभिनय करत नव्हते, असं त्याचं मत होतं. पण सीमाताईंचं म्हणणं पडलं कि इतरांनीही सामावून घ्यायला शिकायला हवं. कोणा एकाचा किंवा एका गटाचा हेका चालवून घेणं हेही बरोबर नाही ना?

तेव्हा काही न सुचून निशांत म्हणाला, "पण माईंनीही समजून वागायला पाहिजे ना? कधी त्या त्यांच्या पध्द्तीच्या अभिनयावर जातात. असा काहीतरी मेलोड्रामा करून माझ्या नाटकाचा विचका करतील ......"

"अरे मग तू दिग्दर्शक कोणत्या कामाचा?" सीमाताईंनी त्याची थट्टा केली, पण मग गंभीर होत म्हणाल्या, "खरं सांग, तुला असं खरंच वाटतं कि त्या, त्यांचा अभिनय तुझ्या नाटकाचा बेरंग करतील?" निशांत गप्प राहिला.

धुसफुस झाली, चिडचिड झाली, पण कुठेतरी सगळ्यांना आपल्या तुसड्या वागण्याच्या जाणीवेची शरमही वाटली असावी. माईही बदलल्या होत्या. आता त्या आपलेपणाच्या उमाळ्याने सर्वांशी प्रत्येक बाबतीत बोलत राहण्याचा उत्साह दाखवत नव्हत्या. निशांत बोलावेल तेव्हा, सांगेल तसं नि तेवढंच काम करीत आणि पुन्हा आपल्या कोपऱ्यात काही पुस्तक वाचत बसत. त्यामुळे कोणाला फारश्या तक्रारीला जागा राहिली नव्हती.

पहिल्या प्रयोगाचा दिवस आला. सगळयांसाठीच ती तणावाची वेळ होती. पण खास करून माईंसाठी. सीमाताईही आल्या होत्या. प्रयोगासाठी त्या सर्वांनाच – आणि माईंना – भेटायला, शुभेच्छा द्यायला रंगपटात गेल्या. इतक्या नाटकांचे प्रथम प्रयोग केलेल्या माईंसाठी ही काही नवीन गोष्ट नव्हती कि त्यांना प्रोत्साहनाची गरज असावी. परंतु मध्यंतरी बराच खंड पडल्यानंतर त्यांची ही पुन्हा नव्याने सुरूवात होती. सीमाताईंनी माईंचे हात हातात घेऊन काही न बोलता नुसते थोपटले, माईंसारख्या मुरलेल्या अभिनेत्रीला त्या काय बोलणार?

प्रथम प्रयोग पार पडला – नुसता पार नाही पडला, तर अत्युत्तम रित्या संपन्न झाला. प्रेक्षकांच्या टाळयांनी थिएटर डोक्यावर घेतलं. कुमुदिनीबाईंच्या अभिनयाला विशेष प्रतिसाद मिळाला. प्रेक्षकांच्या आग्रहास्तव त्या अभिवादनासाठी पडद्या बाहेर आल्या तेव्हा सर्वांनी उभं राहून त्यांना मान दिला.

माई थकून रंगपटात येऊन बसल्या. सगळेच आनंदात एकमेकांना टाळया देऊन, पाठीवर थाप मारून वाहवा करत होते. निशांत माईंसमोर आला. त्यांच्या समोर गुडघ्यावर बसून त्याने हात जोडले. "काय बोलू माई? शब्द नाहीत. गाजवलत तुम्ही!" दोघेही आपापल्या डोळयांतले अश्रू लपवण्याचा प्रयत्न करत होते.

"अरे बाबा, तुझ्या अपेक्षेत मी उणी तर पडले नाही ना? मला तीच चिंता होती." माई थरथरत्या आवाजात म्हणाल्या. "नाही माई, उलट मीच – कधी

कामाच्या तापात अधिक उणं बोललो असेन तर माफी मागायला आलो आहे." निशांत बोलला.

स्टेजच्या पाठी, ग्रीन रूममध्ये सर्वत्रच एक जल्लोष चालला होता. या प्रयोगासाठी बरेचसे खास आमंत्रित आले होते. ते आता पाठी येऊन सर्वांचं अभिनंदन करत होते. मिठाई मागवली गेली. सगळी एकच गडबड उडाली होती.

सीमाताई जराश्या दूरच थांबल्या होत्या, आपल्या परिचितांशी बोलत होत्या. गर्दी ओसरल्यावर त्या ग्रीनरूममध्ये गेल्या. सगळी मंडळी बाजूच्या खोलीत पार्टी करण्यात गुंतली होती. ग्रीनरूममध्ये माई एकट्याच एका कोपऱ्यात डोळे मिटून बसल्या होत्या. चेहरा श्रांत दिसत होता, पण त्यावर एक समाधानही होतं. सीमाताईंच्या चाहुलीने त्यांनी डोळे उघडले.

"माई, मी तुम्हाला काय बोलणार?" त्यांचा हात हाती घेत सीमाताई म्हणाल्या, "अप्रतिम होता तुमचा अभिनय!"

"तुम्ही जोर दिला नसता तर शक्य झालं नसतं," माईंनीही लगेच पोच दिली, "तेवढ्यानेही झाले नाही, पुढची दारेही उघडली," सीमाताईंचा प्रश्नार्थक चेहरा बघून त्यांनी खुलासा केला, "आमंत्रितांमध्ये जीवन सामंत होता. माझ्याबरोबर नायकाचं काम करणाऱ्या शरद सामंतांचा मुलगा, आता सिनेमा दिग्दर्शक आहे म्हणे. इथे मला भेटायला येऊन त्याच्या पुढच्या दोन चित्रपटात काम देऊ केलं. उद्या येऊन करार करणार आहे. मी माझ्या दमानं, तब्येतीनं काम करू शकेन आणि रोजीरोटीही

मिळेल. बाई, मला अपेक्षा नव्हती ते मिळालं आणि ते तुमच्यामुळे. ही भूमिका नेहमी तुमचीच होती, आता तुम्हीच करा. निशांतने गळ घातली कि एवढी मेहनत घेतलीय तुम्ही तर निदान पाच प्रयोग तरी करा. म्हणून तेवढे करीन. त्यानंतर संपूर्णतः तुम्हीच......"

"मला बाहेरगावचे प्रयोग ठीक आहेत, सिनेमाचं काम प्रत्यक्ष सुरू होईपर्यंत तुम्हीच ...." पण सीमाताईंचं वाक्य माईंनी पूर्ण करू दिलं नाही. "नाही. ठरलं ते ठरलं. पाहा, आपण भविष्याची चिंता करत होतो, पण तुम्ही हट्टानं मला परत घेऊन आलात, आता माझ्या भविष्याची काळजी थोडी तरी मिटली. तुम्ही हे जे निरपेक्षपणे केलंत, माझी खात्री आहे – तुमच्याही पुढच्या काळात कुठल्याही सावल्या नाही भेडसावणार तुम्हाला ......."

दाटल्या कंठाने दोघी हात धरून निःशब्द बसून राहिल्या.

# रोपटं

"अरे, ही कोण? नवी पाहुणी?" सलिलने इशापाठोपाठ धावत आलेल्या नीरुला पहात विचारले.

"पाहुणी नाही, ती आपलीच…" मिता हसत हसत म्हणाली, "नाव सांग तुझं बेटा…" "नीरु…." ती जरा बुजूनच म्हणाली. "हं…हॅलो म्हण पपांना….." मिताने प्रॉम्प्ट केले.

"पपा?" सलिल चांगलाच गोंधळला. नीरुने "हॅलो" म्हणत पटकन वाकून नमस्कार केला. "हे रमाकाकींचे संस्कार," मिताने हसून मान डोलावली. "अगं हे आहे काय?...." सलिलचा आल्याआल्याच बिनसत जाणारा मूड पाहून मिताने मुलींना खेळायला पिटाळले.

"बस, मी सांगते…." त्याला थंड पाणी देत मिता म्हणाली, "आपल्या रमाकाकींच्या घरची आहे, त्यांच्या नात्यातली, पण आता तिचं कोणी नाही. मी त्यांच्याकडे हळदीकुंकवाला गेले होते ना… आपण त्यांच्याकडे फारसं कधी जात नाही तेव्हा नुसतं हळदीकुंकु घेऊन निघणं औपचारिक दिसतं म्हणून मी मदतीला काम करू लागले. इशा एकटी पडली, पण ही नीरु येऊन तिच्यासोबत खेळू लागली. दोघींचं इतकं मस्त जमलं ना…"

"पण म्हणून काय……?"

“घरी आल्यावर मलाही करमेना, खूप आपलीशी वाटत राहिली....मग दुसऱ्या दिवशी जाऊन काकींना म्हंटल मी घेऊन जाते, आमचीच दुसरी मुलगी म्हणून.....” त्याच्या चेहऱ्यावरचे सरसर बदलणारे भाव पाहून मिता घाईघाईने बोलली, “अरे, आपण केव्हाच ठरवलं होतं ना... जेव्हा डॉक्टरांनी मला सांगितलं कि दुसरं मूल होण्याची रिस्क मी घेऊ शकत नाही, तेव्हा इशाला सोबत असावी, ती मोठी होऊन लाडावलेली, बिघडलेली एकुलती एक मुलगी होऊ नये म्हणून.... आपण अडॉप्शनसाठी फॉर्मसुध्दा आणून सर्व तयारी करतच होतो ना... मग म्हंटलं ही घरचीच आहे, नात्यातली.... तर अजून दुसरी कोण कुठली कशाला दत्तक घ्यायची...”

“अगं पण...” सलिल जरा वैतागूनच बोलला, “इतकं लगोलग घरीच आणायची काय घाई होती? हे म्हणजे अगदी सेलमध्ये आवडलेली साडी उद्यापर्यंत शिल्लक राहील की नाही माहीत नाही म्हणून आज लगेच घेऊन टाकण्यासारखं केलसं तू.... रमाकाकींच्या घरचीच ना, मग मी टूरवरून आल्यावर आपण सावकाशीने जाऊन घेऊन आलो असतो की... टूरवर जातांना मला एक मुलगी आणि आल्याआल्या दोन मुलींचा पपा? अगं कुत्र्या-मांजराचं पिल्लू घरी आणतांना देखील लोकं दहादा विचार करतात....आणि तू मला विचारलं देखील नाहीस?”

“मी जरा इंपल्सिव्हच आहे नै? चुकलंच माझं....” मिता अगदी रडवेली होऊ लागली, “मला...मला तिची इतकी ओढ वाटली नं, शब्दात एक्सप्लेन करून नाही सांगता येत... काकीही म्हणाल्या थोड्या दिवसांकरता हव तर घेऊन जा, पोरीलाही जरा बदल होईल. नक्की काय करायचं ते मागाहून ठरवू. पण मीच त्यांना म्हंटलं, माझं तर नक्कीच ठरलंय, ही माझीच पहिली मुलगी, इशाहून थोडी मोठीच

आहे ना… पण..पण आता तुलाही जर हे पसंत नसेल, तर…. मी तिला रमाकाकींकडे परत नेऊन सोडते हवं तर…"

"आता…. तुला काय खेळणं वाटलं काय?" सलिल चिडून म्हणाला, "हवं तर घेऊन यायचं, हवं तेव्हा परत नेऊन सोडायचं? हं?" रागाने हात उडवत तो आत निघून गेला.

वॉश घेऊन ताजातवाना होऊन येईपर्यंत सलिल जरा थंड झाला होता. किचनमध्ये नाक डोळे पुसत मिता त्याच्या आवडीची भजी तळत होती. "आता काय झालं रडुबाई?" तो किंचित थट्टेने म्हणाला, "ठीक आहे, हरकत नाही, इशासारखी ती ही आपलीच, मग तर झालं? हं पण ते पेपरवर्क आणि कचेऱ्यांचे हेलपाटे, ते मात्र…."

"नाही नाही, ते सगळं मी करेन…" डोळे पुसत मिता हुशारुन म्हणाली.

"आल्या आल्या असा धक्का दिलास ना, म्हणून वैतागलो ग… पुन्हा असं करू नकोस हो…"

"नाही रे….म्हंटलं ना माझ चुकलंच…पुन्हा कधी मोठे डिसिजन्स एकटी घेणारच नाही…"

"पण काय गं, एक सांग," सलिल एक भजं उचलून काळजीपूर्वक निरखत गंभीरतेचा आव आणत म्हणाला, "ते हिंदी सिनेमातून दाखवतात, हिरॉईन कुमारीमाता होते आणि मग लग्नानंतर आपल्या मुलीला अनाथाश्रमातून घरी घेऊन येते…. तसं तर काही…"

“हो नं, अगदी बरोबर,” तळणीचा झारा त्याच्या नाकासमोर नाचवत कृतक-कोपाने मिता म्हणाली, “मी हिंदी सिनेमातली कुमारीमाता आणि पोरीला मात्र नेऊन ठेवलं तुझ्या रमाकाकींच्या घरी! काय तरी....”

सलिल हसला, “रमाकाकींचं घर म्हणजे सगळ्यांसाठी मुक्तद्वार. कोण कुठले नात्यागोत्याचे सारे तिथे येऊन राहात असतात. लोकं घरातल्या नको असलेल्या मांजरी-पिल्लं कशी दुरच्या कुठल्या घराच्या फाटकासमोर नेऊन सोडतात, तसे सारे निराधार त्यांच्या दारी पोचतात.....हं चला, ...मस्त गरमगरम भजी खाऊन मग पोरींना बाहेर नेऊन छान आईस्क्रिम खिलवुया, जरा खेळणी बिळणी घेऊया... चला मुलींनो, या पटापट....”

नीरू त्या घरात चांगली रुळू लागली. सलिल तिला अगदी इशाइतक्या जवळिकिने वागवत नव्हता, अर्थात मिताने तशी अपेक्षाही केली नव्हती, पण सलिल-मिताच्या थोड्याश्या आपलेपणाने देखील नीरूची बूज बरीच कमी होउ लागली. इशासोबत तर चांगलीच गट्टी जमली.

मिताने रमाकाकींना फोन करून कळवूनही टाकले की फेरविचार करण्याची गरजच नाही, नीरू आता तिचीच. मध्ये कधीतरी येऊन त्यांच्या आवश्यक असलेल्या सह्या नि नीरूचे काही दाखले वगैरे असल्यास ते घेऊन जाईल, असे सांगितले. जिथे इशा केजीमध्ये होती त्याच शाळेत पहिलीच्या वर्गात नीरूची ॲडमिशन करण्याच्या खटाटोपास लागली. तोवर घरुनच अभ्यास करण्यास नीरू तयार होती. “मम्मी, अगं बघ नीरू पण पपा नि माझ्यासारखी लेफ्फी....तूच एकटी नाही लेफ्फी....” इशाला लेफ्टी बोलायला अजून जमत नव्हतं. “हो? बघू बघू. अय्या खरंच की, नीरू सुध्दा डावखुरीच ....” मिताला गंमत वाटली.

एका रविवारी अचानक रमाकाकी घरी आलेल्या पाहून मिताला आश्चर्यच वाटलं. “अगं नीरूचा जन्मदाखला वगैरे कागदपत्र द्यायचे होते…” त्या म्हणाल्या.

“अहो काकी मी येणारच होते की, तुम्ही कशाला त्रास घेतलात….” मिता म्हणाली.

“नीरूलाही पहायचं होतं, म्हंटलं काही त्रास वगैरे तर देत नाहीए ना….” त्या हसत म्हणाल्या.

“का आम्ही तिला बाल मजूर तर बनवलं नाही ना हे पहायला आलात काकी?” बाहेरच्या हॉलमध्ये येत सलिल थट्टेने म्हणाला. “उगाच काहीतरी बोलू नकोस हो,” काकी जरा दरडावूनच म्हणाल्या, “अशी शंकाही माझ्या मनात नाही आली. मी आले तेव्हा दोघी बाहेरच खेळत होत्या, किती छान खुललीय, खुश आहे. आमच्या घरच्या गर्दीत पार हरवूनच गेली होती पोरगी.”

“कुणाची हो ती, काकी?” सलिलने सहजपणे विचारले, “तुमच्या कुणा नात्यातली…..?”

“अरे तुला माहीत नाही? ही रेणूची…..रेणूका, आठवते का तुला?” रमाकाकी म्हणाल्या, “अगदी शांत, लाजरी बुजरी होती बघ, आपल्याच कोपऱ्यात गप्प राहायची…” सलिल किंचित ताठरला, त्या दोघींच्या लक्षातही नाही आले. त्याला रेणू नक्कीच आठवत होती, काकींच्या घरी राहणारी रेणू, जिने तिथे धूमकेतूसारख्या मध्येच उगवणाऱ्या तडफदार सलिलवर प्रेम करण्याची एकच चूक केली, त्याचं तिच्यावर प्रेम नाही हे माहीत असूनही….काकी बोलतच होत्या, “नाही आठवायची तुला, अगदी भोळी होती बिचारी, माहीत नाही कुठे नि कसा पाय

घसरला.... का कुणी फसवलं तिला? एवढं मोठं घर नि एवढी माणसं, मी तरी कुठे कुठे पुरी पडणार? बाहेर कॉलेज, क्लासेसनाही जायची.. ... कोण होता? शेवटपर्यंत पोरीने तोंड उघडलं नाही कि नाव सांगितलं नाही."

मिता डोळे विस्फारून ऐकत होती. "दिवस गेले ते सुध्दा कळू दिलं नाही तिनं, जेव्हा लपवूच शकली नाही तेव्हा खूपच उशीर झाला होता....बाहेरचे, ओळखीपाळखीचे लोकं खूप काही बोलले, ही चूप,मुलगी जवळजवळ वर्षाची झाली, तेव्हा एक दिवस अचानक रेणू नाहीशी ...लिहून गेली कि माझ्यासाठी जराही त्रास घेऊ नका....."

"क...कुठे गेली?" मिताने अडखळत विचारले. काकींनी उसासा टाकला, "बोलणारे बोलत राहिले, तिची लक्षणंच खोटी, मुलीला टाकून गेली कुणा दुसऱ्याबरोबर पळून. पण ...मला माहीत आहे...ती आता नाहीए..."

"मला वाटलं, नीरूच्या घरचे आजारात किंवा अपघातात गेले.... मला हे माहीतच नव्हतं..." मिता

"सलिल तुझ्या तर ऐकण्यात आलं असेल ना तेव्हा," काकी म्हणाल्या, "अश्या गोष्टींचा बभ्रा होतोच...."

"नाही... मला माहीत नव्हतं," सलिल जरा तुटक आवाजात बोलला, "पाच सहा वर्षांपूर्वी म्हणजे मी तेव्हा खूप वेळा टूरवरच असायचो...."

"तरीच... मी समजले तुला ठाऊक आहे की ही रेणूची मुलगी..."

“अगं मिता, तू काय बोलत बसलीस? काकींना काही चहा-सरबत नाही विचारलंस…” सलिलने आठवण करून दिली तशी काकी ‘नको’ म्हणत असतांनाही मिता आत गेली.

“काकी आमची मिता आहे ना, जरा इंपल्सिव्हच आहे, पुढचा विचार न करता झटका आला की मनातलं करून मोकळी होते,” सलिल समजावणीच्या सूरात बोलला, “आता हेच पाहा ना, तिने स्वतःनेच ठरवलं होतं कि इशा शाळेत जाऊ लागली की आपलं करिअर पुन्हा सुरू करायचं… पण आता ह्या नीरूला घेऊन आली.दोन मुलींचं करण्यामध्ये हिचं करिअर तर राहू दे, स्वतःसाठी तरी वेळ मिळणार आहे का हिला….?”

“अरे…” काकी जराश्या गोंधळल्या, खुलासा करावा तश्या म्हणाल्या, “हे..मला याची कल्पना नव्हती. अरे पण मी काही तिला सांगितलं नाही कि मुलीला घेऊन जा म्हणून, उलट मीच म्हणाले कि हवं तर थोडे दिवसांसाठी ने, बदल होईल मुलीला. पण कायमचं ठेऊन घे असं मी अजिबात सुचवलं देखील नाही. मग? नेऊ का परत? आमच्या एवढ्या मोठ्या खटल्यात हा एवढासा जीव काही आम्हाला जड नाही हो….”

तोवर बाहेर आलेल्या मिताने विचारले “का? काय झालं?” काकींनी स्पष्ट करताच मिताने हसून मान उडवली, “हा सलिल ना काहीही बोलतो. अहो मला अजिबात काही त्रास नाही कि जड नाही हो नीरू. उलट इशाच्या पाठी लागणारा वेळही वाचतो आता…. तिचं पाहून इशाही हाताने जेवते, आपले कपडे, बूट स्वतःच घालते नाही तर नीरू तिला मदत करते. माझं काम खरचं कमी झालंय, मी करीनच माझ्या करिअरची पुनः सुरुवात….” मग नीरूच्या राहाण्याबद्दल प्रश्नच नाही उरला.

"पपा, मला आंबा..." सलिलच्या हातावर रेलत इशा म्हणाली, तशी आपल्या प्लेटमधून सलिलने तिला फोड भरवली. मग नीरूही हळूच बोलली, "मला पण....?" तसा सलिल म्हणाला, "तू तुझ्या मम्मीकडे जाऊन माग.." ती हिरमुसून मागे हटली. बाजूने पहात असलेल्या मिताने काही न बोलता नीरुला आंब्याची फोड दिली. थोड्यावेळाने, त्या दोघी आजूबाजूला नाहीत असं पाहून तिने शांतपणे सलिलला विचारले, "तिच्याशी का असं वागतोयस तू? किती कानकोंडी होते ती..... "

"हे बघ, दोघींचे लाडकोड पुरवत बसायला मला वेळ नाही...." सलिल तुटकपणे म्हणाला, "तू आणली आहेस ना, तूच कर तिचे लाड....." "अरे, काय झालयं तुला...? ती आली तेव्हा किती सर्व छान होतं, तिलाही लळा लागला.... आणि आता...?" मिताच्या प्रश्नाला उत्तर न देता तो उठला. "हे बघ आधीच ऑफिसच्या कामाचं प्रेशर वाढतयं, त्यात तू अजून......" तो आत निघून गेला. यावर मिता पुढे काही बोलली नाही. ऑफिसमध्ये, घरी कधीही काही तणाव वाढू लागले की सलिलला एक घुसमटल्यासारखा खोकला किंवा श्वास लागल्यासारखा त्रास होऊ लागे...आताही तसंच झालं.

"कोण? कुणाला खोकला झालाय? इशा?" रात्रीत आवाजाने अचानक उठून सलिलने विचारले. "नाही, नीरू..." मिता उत्तरली. "जा, जरा गप्प कर जा तिला..." सलिल तिरसटून पुन्हा झोपी गेला. दुसऱ्या दिवशी मग मिता तिला डॉक्टरांकडे घेऊन गेली. ते तपासून म्हणाले, "नाही, छातीत काही कफ वगैरे नाही ....हे तर तिच्या वडिलांसारखंच..." ते हसून म्हणाले. "अहो डॉक्टर...." मिता

बोलायला गेली कि डॉक्टर, तुम्ही माझ्या दोन मुलींमध्ये गल्लत करताहात.... पण खरंच ते गल्लत करत होते का? तिचा श्वासच अडकल्यासारखा झाला.

डॉक्टरांनी काही चूक तर नाही केली ना याची खात्री करण्यासाठी तिने घरी आल्यावर परत त्यांना फोन करून विचारले. "अहो मुलांना देखील टेन्शन्स, ताण जाणवतात. तुम्ही तिच्यावर कसलाही दबाव तर टाकत नाही ना? शाळेत टीचरना देखील रिक्वेस्ट करा .... तिच्या वडिलांसारखंच तिलाही टेन्शनने श्वासाचा त्रास होतोय...." मिता गोठल्याप्रमाणे एकाच जागी उभी राहिली...

तिच्या बधिरल्या मनात एकेक गोष्ट उलगडू लागली.होते, बऱ्याच गोष्टींमध्ये साम्य होते. डावखुरी तर होतीच, पण तिच्या चालण्याबोलण्याच्या लकबींमध्येही कधी सलिलची झाक दिसे. 'तू पपांची नक्कल करतेस की काय?' असं मिताने थट्टेने विचारलं कि आपण पपांना चिडवतो आहोत असं समजून मम्मी रागावतेय या विचाराने पोरगी घाबरुन जायची. 'नाही नाही... मी नाही नक्कल करत, मी अशीच बोलते.....' ती घाईघाईने सफाई देई.

जितकी माहिती काढता येईल तितकी मिळवण्याच्या उद्देशाने ती रमाकाकींच्या घरी नीरूच्या जुन्या शाळेचा दाखला घेण्याच्या निमित्ताने जाऊन पोहोचली. सहज बोलल्यासारखा तिने रेणूचा विषय काढताच काकी खूप बोलत राहिल्या आणि ती कान देऊन ऐकत राहिली. नीरूच्या वडिलांबद्दल काहीही कळतं का याचा ती सुगावा घेत राहिली पण काकींना सलिलच्या तिथे येण्याजाण्याबाबत विचारू धजली नाही. एक मात्र नक्की कळलं कि रेणू नाहीशी झाली ती सलिल-मिताच्या लग्नानंतर दोन दिवसांतच. ती वाट पहात होती? आशा होती तिला...जी सलिलने लग्न करताच पार मावळली? मिता विषण्ण झाली.

त्या घरात वरवर जरी सर्व नेहमीसारखंच असलं तरी पृष्ठभागाखालून वाहणरा एक स्ट्रॉंग प्रवाह/अंडरकरंट दोघांनाही जाणवत होता.सलिलच्या लक्षात आले होते कि सत्यपरिस्थिती मिताला कळली होती….तिच्या अधल्या मधल्या कमेंट्सवरून कळत होते. “नीरू, तुझं नाव किती छान ठेवलंय, नीरजा… नीर-जल-पाण्यातून जन्मलेली….” सलिलला त्याच्या नावाचा अर्थ सांगण्याची गरज नव्हती. कधी म्हणायची, ‘घाटाचं पाणी वळून घाटालाच परतलं…’ ‘आपल्या घरचं रोपटं आपल्याच अंगणात रुजलं तरच बरं ना….’

शनिवार होता तरी कामाच्या प्रेशरमुळे सलिल घरून लॅपटॉपवर काम करत होता. नीरू आताशा त्याला खूप बिचकून असे नि त्याच्या आजूबाजूलाही फिरकत नसे. पण घरातच लपाछपी खेळतांना इशाला चुकवण्याच्या नादात नीरू सलिलच्या खुर्चीपाठीच येऊन लपली. झालं! सलिलचा आवाज चढला, “काय आहे इथे? काम करतोय दिसत नाही… हे घर आहे का बाजार? शांतपणे एक काम करता येत नाही.चल निघ इथून….”

नीरू हुंदके दाबत बाहेर पळाली. उसासा टाकत मिताने मुलींना दुसऱ्या खोलीत नेऊन आयपॅडवर कार्टून्स लावून दिले. दोघी त्यांत गुंगल्यानंतर ती सलिलपाशी येऊन म्हणाली, “सलिल अरे का तिच्यावर असा डाफरत असतोस? का इतका तिटकारा करतोस तिचा?”

“तू अजून डोकं खाऊ नकोस. मला काम करायचय….नकोय मला ती डोळ्यासमोर…” तो करवादला.

“का नकोय डोळ्यासमोर?” त्याचं काम असलं तरी मिताने ठरवलं कि आज बोलायचंच. घर, फॅमिली हे कधीही कामापेक्षा जास्त महत्त्वाचे आहेत, “डोळ्यासमोर नकोय कारण ती तुला तुझ्या चुकीची आठवण करून देते, म्हणून?”

“मी काही चूक केली नाहीये....” तो लगेच पलटून म्हणाला, “मी..मी काही तिच्या, त्या रेणूच्या पाठी लागलो नव्हतो....”

“मग ती काय होती तुझ्यासाठी? एक टाईमपास...?” मिताने जरा चिरडीला येऊन विचारले, “अरे, अन्याय झालाय एका जीवावर.... रेणूवर...”

“अन्याय? काहीही बोलू नकोस. मी काय अन्याय केला? मला तर माहीतही नव्हतं.... काही...म्हणजे या या नीरूविषयी.....” सलिलने साफ झटकूनच टाकले.

“माहीत नव्हतं हा तर बहाणा झाला ना? माहीत करून घ्यायला नको होतं? तुझ्या...तुझ्या वागण्याची निष्पत्ती काय होऊ शकते याची कल्पनाही नसायला तू इतका साधा भोळा तर नक्कीच नाहीस ना....” मिताही विषय तसाच सोडून द्यायला तयार नव्हती. “ठीक आहे.... तुला नव्हतं माहीत. पण आता? एक अन्याय झाला तुला माहीत नव्हतं, पण कळूनही दुसरा अन्याय का करतोयस? आता तर तुला माहीत आहे ना ती तुझी कोण...? मग जाणून बुजून का दुःस्वास करतोस पोरीचा? तुझ्या नकळत अन्याय झाला असेल, पण दैवयोगाने संधी चालून आलीय तुला परिमार्जन करण्याची..... आणि तरीही तू....”

“हे बघ मला लेक्चर नकोय तुझं....” तो वैतागून बोलला, “मला नाही जमणार. मला तुझ्यासारखं लोकांसमोर मोठेपण नाही मिरवायचंय की पहा मी

याच्या…याच्या मुलीचा स्वीकार केला; ना साधुसंत आहे मी इतकं मोठं मन असायला….”

“अरे काही तरी काय बोलतोस?” मिता उद्गारली, “कोणासमोर मोठेपणा मिरवते मी? कुणाला माहीत आहे, आपल्या दोघांखेरीज? तिसरीला माहीत होतं ती आता नाहीये….मग? आणि मोठ्या मनाचं म्हणशील तर.. तू समजतोस, माझ्या मनाला काय क्लेश होत नाहीत? प्रत्येक वेळेला तिला बघते तर… पण मग तिच्या दृष्टीने विचार करते, एवढासा जीव, तिला बिचारीला कळतही नाही कि कोण आपल्याशी कसे नि का वागतात… तिची आई नाहीशी झाल्यापासून ती जिथे जाईल तिथे फक्त एक उपरी, परकी….एकटी, कुणाचीही कुणी नाही. किती घुसमट होत असेल त्या लहान जीवाची. आणि या सर्वात तिचा दोष काय, सलिल? का असं आयुष्य तिच्या वाट्याला? तुला जरी स्वतःची जबाबदारी झटकून तिच्याकडे पाठ फिरवायची असेल तरी मी नाही तसं करू शकत. माझ्या मनावर दगड ठेवायला लागला तरी मी हे घर तिच्यासाठी तिचं स्वतःचं, हक्काचं घर करीनच….”

रात्री मिताला अचानक जाग आली, पहाते तर सलिल दोन्ही हातांच्या तळव्यांवर डोकं ठेऊन बिछान्यावर स्तब्ध बसलेला, ती काही बोलली नाही. त्याचा आतील लढा त्याला स्वतःलाच लढायला हवा.

दुसऱ्या दिवशी सकाळी मिता रविवारचा नाश्ता बनवित होती तेव्हा सलिल बाहेर हॉलमध्ये आला. “काय ग इशा,” तो लेकीला म्हणाला, “तुला खेळायला नीरू मिळाली तर तू आपलं सर्व विसरूनच गेलीस? काय खेळायचो आपण रविवारी सकाळी?” इशाने एक मिनिट विचार केला, “घोडा घोडा….” ती चित्कारली.

“मग चला… पण मोठी कोण? ती आधी बसणार….” सलिल डोळे मिटत लपंडाव खेळल्यासारखा म्हणाला.

“नीरू!” इशा उडी मारत म्हणाली, तिला अजिबात ईर्षा नव्हती. ती किती हरखली आहे ते नीरूच्या फुललेल्या चेहऱ्यावरच दिसत होतं, पण तरीही अवघडून म्हणाली, “मी…मी मोठी आहे नं? वजन…पाठ दुखेल…”

“अरे हॅट….” सलिलने हात उडवले, “आपला घोडा बघ एकदम तगडा आहे… काय नाही होत. चला चला….”

घर पोरींच्या किलकाऱ्यांनी भरून गेलं तसे मिताने हसून आपले डोळे पुसले.

# वसा जन्मभराचा ...

वनिता मिसनी पुन्हा आपले मनगटी घड्याळ पाहिले, मग समोरच्या भिंतीवरचे. अर्धा तास होऊन गेला होता. त्यांनी थांबायलाच नको होते, हे असेच होणार याचा थोडासा अंदाज त्यांना आला होता. इंटरव्ह्यू घेणाऱ्यांच्या पॅनेलमध्ये मुख्य जागी संजनाला पहाताच त्यांनी समजून जायला हवे होते. पण इंटरव्ह्यूनंतर त्यांना एकटीने भेटण्याची इच्छा संजनाने व्यक्त केली, त्यामुळे त्या थांबल्या खऱ्या, पण पुढे काय होणार याची पूर्ण कल्पनाही आली.

ट्रस्टींसाठी राखून ठेवलेल्या दालनाबाहेरील रिसेप्शनिस्टने फोनवर बोलून मग मिसना सांगितले, “मॅडम तुम्हाला आता भेटतील.” सर्व काही ओळखीचं तरी नवंनवं वाटत होतं त्यांना, विशेषतः स्टाफ नवीन होता. पण ...संजना त्यांच्यासाठी नक्कीच नवीन नव्हती. एक खोल श्वास घेत त्या दरवाजा उघडून आतल्या दालनात गेल्या. ही क्वचितच वापरली जाणारी कॉलेजच्या ट्रस्टींसाठीची रूम होती, त्यामुळे कामापुरते टेबल-खुर्च्या होत्या.

“या वनिता मिस्,” संजनाने हात जोडून त्यांचं हसून स्वागत केलं. त्या खोट्या दिखाव्यामागील तिच्या मनातील विचारांची कल्पना वनिताबाई करू शकत होत्या. “मिस्, खरंतर तुम्हाला असं वेगळं थांबून भेटायला सांगणं बरं नाही वाटत. पण दुसरा मार्ग नव्हता. तिथे, इंटरव्ह्यूमध्ये सर्वांसमोर बोलायचं नव्हतं मला...”

म्हणजे तिला काय बोलायचं होतं, कसा मागील इतिहास उकरून काढायचा होता, ते वनिताबाईंच्या लक्षात आले.

त्या काही न बोलता तिला न्याहाळत राहिल्या. किती, जवळजवळ दहाहूनही अधिक वर्षं झालीच होती. कॉलेजातल्या कोवळ्या तारूण्याचा शिडशिडितपणा जाऊन उमेदीतल्या स्त्रीची गोलाई चेहऱ्यावर, शरीरावर दिसत होती. सौंदर्य, शरीर सौष्ठव व्यवस्थित जपलं होतं. तिशीची असूनही विशीचीच वाटत होती. एक गोष्ट मात्र अजिबात बदलली नव्हती – तिची मग्रुरी, तिचा ताठा. उलट, पदाच्या अधिकारामुळे तो अहंकार अधिकच वृध्दिंगत झालेला दिसत होता.

“उभ्या का? बसा ना…” संजनाच्या शब्दांनी त्या भानावर आल्या. “कॉफी घेणार ना?” म्हणत संजनाने इंटरकॉमवरून कॉफी आत पाठवायची सूचना केली. “हं…मग? कशा आहात मिस्? बाकी सर्व कसे आहे? मध्यंतरी तुमच्या मोठ्या मुलीचं लग्न झालं असं कळलं…” त्या हूं हूं करत ती मूळ मुद्द्याकडे वळण्याची वाट बघत राहिल्या.

त्या अधिक काही बोलत नाहीत हे पाहून संजना म्हणाली, “हं….मला तशी कल्पना आहे तुमच्या – अं – वैयक्तिक समस्यांची. मग? तुम्हाला पुन्हा आपल्या कॉलेजात शिकवण्याची इच्छा आहे तर…” मग संजना जरा आक्रमकपणे सरसावून एकदम म्हणाली, “खरं सांगू, मिस्? माझ्या जागी दुसरी कोणी असती ना, तर आतापर्यंत तुमचा अर्ज फाडून कचऱ्याच्या टोपलीत पोहोचला असता. तुम्ही ज्याप्रमाणे कॉलेजात माझ्यावर ॲक्शन घेतलीत….”

जेव्हा संजनाला तिच्या वडिलांच्या जागी ट्रस्टींच्या खुर्चीत पाहिले, तेव्हाच पुढे हेच होणार हे बाई समजून चुकल्या होत्या. “कॉलेजात झालेले बदल माहीत

असते तर अर्ज करण्याविषयी फेरविचार केला असता," त्या स्थिर आवाजात म्हणाल्या. एक क्षण संजनाने त्यांच्याकडे रोखून पाहिले मग दुसऱ्याच क्षणी जणू ती कडवटपणे काही बोललीच नव्हती अश्या स्वरात हसून म्हणाली, "पण मिस्, मी इतरांसारखी, किंवा 'इतर' मला समजतात तितकी वाईट नाहीये. तुम्हाला सर्व परिस्थिती समजावून सांगण्यासाठी मी एकटीने भेटायला बोलावलं. असं पहा, आपल्या कॉलेजात प्रोफेसरच्या पोस्टसाठी ओपनिंग/व्हेकन्सी नाहीये. अगदी अतिरिक्त जागा जरी निर्माण केली, तरी या वयात सतत उभं राहून इतक्या मुलांना तासंतास शिकवणं तुम्हाला मुश्किल नाही होणार? आणि.... आताच्या मुलांबरोबर... अं..तुम्हाला जरा कठीणच होईल मिस्...." तिच्या ओठाच्या कोपऱ्यावर जरासं उपहासाचं स्मित उमटलं.

काही न बोलता बाईंनी उठण्याची तयारी केली. एक तासापूर्वीच त्यांना कळून चुकलं होतं की त्यांना जॉब मिळणार नाहीये. त्यासाठी त्यांचा अजून एक तास मोडण्याची गरज नव्हती.

"थांबा मिस्, माझं बोलणं पूर्ण झालं नाहीये," संजना म्हणाली, "कॉलेजात जॉब नाहीये, पण माझ्या कंपनीत ओपनिंग आहे, होऊ शकेल. आणि पॅकेजही कॉलेजपेक्षा नक्कीच चांगलं मिळेल...." ती त्यांचा चेहरा न्याहाळत राहिली. बाई ना भोळ्या होत्या ना मूर्ख. हा तिचा सापळा होता, सोनेरी सापळा. त्या त्यांच्या नेहमीच्या शांत स्वरात उत्तरल्या, "ऑफरसाठी आभारी आहे. पण मी फक्त शिक्षिकेचंच काम केलं आहे. कंपनीतील कामाची ना मला कल्पना आहे ना मला ते जमण्यासारखं आहे."

"न जमण्यासारखं काय आहे त्यात, मिस्?" ती लगेच म्हणाली, "इथे इतकी वर्षे अकाउंट्स शिकवलत, त्याचाच व्यवहारात उपयोग करायचा आहे. तुम्हाला नक्की जमेल. आणि शारिरीक दगदगही बरीच कमी राहील. थोडे दिवस करून तर पहा, पण ट्राय केल्याशिवायच नाकारू नका ......."

त्यांना याबाबत विचारही करायचा नव्हता. आभार मानून त्या उठल्याच पण संजना पुन्हा म्हणाली, "नाही मिस्, नाही म्हणायची घाई करू नका. शांतपणे विचार करा. तुम्हाला हवा तितका वेळ घ्या विचार करायला. माझी खात्री आहे, मी काय म्हणते ते तुम्हाला पटेल ...."

वनिता मिस् तिथून निघाल्या. डोकं भिरभिरत होतं, खूप उशीर झालाय एवढंच त्यांना लक्षात होतं. आता काही विचार न करता आधी घरी परतायचं, असं म्हणत त्या कॉलेजातून बाहेर पडल्या. रिक्षाला जास्त पैसे पडतील, पण बसने अजूनच उशीर होईल, असा विचार करेपर्यंत डोळ्याच्या कोपऱ्यातून त्यांनी संजनाला तिच्या कारमध्ये बसतांना पाहिले. तिने येऊन लिफ्ट देण्याची मेहरबानी करण्यापेक्षा.....त्या घाईघाईने समोरच्या रिक्षात बसल्या.

रिक्षा रस्त्याने पुढे धावत होती, पण त्यांचं मन मात्र मागे जात होतं. हा तर त्यांचा नेहमीचाच रस्ता होता...किती वर्षं याच कॉलेजात शिकवलं त्यांनी. कडक शिस्तीच्या प्रोफेसर म्हणून त्यांचं नाव होतं. कुठलीही चुकीची गोष्ट त्या खपवून घेत नसत. त्यांच्या क्लासमध्ये लेक्चर बंक करणं, टवाळ्या करणं, उगाच कुणाच्या खोड्या काढणं हे अजिबात होऊ देत नसत.

त्यात संजना म्हणजे अगदी नाठाळ. तिचे धनाढ्य उद्योगपती वडील कॉलेजच्या संस्थेचे ट्रस्टी होते. त्याचा उपयोग करून ती नियम मोडायलाही मागेपुढे

पहात नसे. मग वनिता मिस आणि संजना यांचे वारंवार खटके उडाले तर त्यात काय नवल? त्यांनी तिला बऱ्याच वार्निंग्ज दिल्या तरी ती वेपर्वाईने त्यांचे बोलणे उडवून लावी. मिस् तिच्या सतत तक्रारी नोंदवित आणि तिला प्रिंसिपलपुढेही हजर करत. सर्व पदाधीकारी अर्थातच यामुळे अस्वस्थ होत. बऱ्याचदा मिसना मागून समजावण्यातही येई की संजनाच्या वाटेला न गेलेलं बरं.

पण बाईंना ते पटत नसे, जर इतर मुलांच्या तक्रारी स्वीकारल्या जातात, मग ही इतके नियम मोडत असतांना हिला का सोडून द्यायचे, केवळ ट्रस्टींची मुलगी म्हणून? प्रत्येक वेळी त्या पुराव्यासह तिच्या तक्रारी नोंदवत, त्यामुळे कॉलेजचे अधिकारी नाकारूही शकत नसत.

सेकंड इयर डिग्रीचे रिझल्टस् दिले गेले तेव्हा वनिता मिसनी पाहिले कि एक विद्यार्थिनी, नेहा टिकेकर, अगदीच रडवेली झाली होती, नंतर तिला मैत्रिणींच्या घोळक्यात रडतांना त्यांनी पाहिले. नापास झाली असावी. तश्या त्या कोणत्याच विद्यार्थ्यांशी फारशी जवळीक ठेवत नसत ना त्यांच्या वैयक्तिक गोष्टीत लक्ष घालत. पण ही मुलगी अगदीच हुशार नसली तरी नापास होण्यासारखीही नव्हती. तिच्या रडवेल्या चेहऱ्याने त्या बऱ्याच अस्वस्थ झाल्या.

या गोष्टीची नीट चौकशी केल्याशिवाय आता त्यांना चैन पडणार नव्हतं. कम्प्यूटरद्वारे निकाल दिले जात, तेव्हा त्यांनी तिथूनच सुरुवात केली. लवकरच त्यांच्या ध्यानात आले की काहीतर गडबड केली गेली आहे. कॉलेज व्यवस्थापकांतर्फे जास्त चौकशी व्हावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले तेव्हा आढळून आले की नेहा आणि संजनाच्या मार्कशीट्स वरील नावांची अदलाबदली झाली होती – अर्थात ती केली गेली होती.

कॉलेजने हे प्रकरण दाबून टाकण्याचा प्रयत्न केला, कम्प्यूटरची चूक होती असे दर्शविले. पण वनिता मिस् गप्प राहिल्या नाहीत. ट्रस्टींच्या कमिटीपुढे जाऊन त्यांनी हा मुद्दा मांडला, कम्प्यूटरचे सारे पुरावे दाखल केले, आणि ॲक्शन घेतली जावी याची मागणी केली. सर्व प्रत्यक्ष पुढ्यात सादर केल्यावर ट्रस्टींचाही नाईलाज झाला. संजनाला एक वर्षासाठी काढून टाकण्यात आलं. अर्थात एक वर्ष झाल्यावरही ती त्या कॉलेजात परतली नाही, आणि ती ते कधी विसरलीही नाही.

संजनाचे वडील वनिता मिससाठी तिथे काम करणं मुश्किल करू शकले असते. पण त्याआधीच मिसनी स्वतःहून निवृत्ती स्वीकारली. त्यांच्या पतीला, म्हणजे अच्युतरावांना तेव्हाच त्यांच्या पहिल्या नोकरीपेक्षाही खूप चांगल्या पगाराची नोकरी समोरून चालून आली. “केलीस खूप वर्षे घरची-कॉलेजची कामं मरमरून. आता दे सोडून. तसंही लेकीचं लग्नाचं वय होतयं, नंतर येतीलच बाळंतपणं आणि काय काय…प्रत्येक वेळेला सुट्टी घेत बसण्यापेक्षा सोडूनच दे. बाकीच्या वेळात मैत्रिणींबरोबर टूर्सला जा, आपले छंद पुरे करून घे…”

वनिता बाईंनी अगदी तसंच केलं. त्यांना मुलं जरा उशीरानेच झाली होती आणि मोठ्या शलाकानंतर जवळजवळ सात वर्षांनी धाकटा सौमित्र झाला होता. त्यामुळे तिच्या लग्नानंतर मग त्याच्या शिक्षणावर लक्ष केंद्रित झाले. तो कॉलेजातच त्याच्या हुशारीने चमकत होता नि पुढे नक्की नाव काढेल हेही दिसतच होते. त्याची नजर होती मोठ्या नामांकित एमबीए संस्थेवर. तिथे प्रवेश मिळाला की पुढे उत्तमोत्तम संधी मिळण्याची खात्री.

हळूहळू अच्युतरावांना कामाचा ताण जाणवू लागला. मोठं पद, मोठं पॅकेज हे सर्व छानच होतं, पण त्याबरोबरच कामाची जबाबदारी, टेन्शन्सही तितक्याच पटीने

वाढली होती. मोठ्या कंपन्यांमध्ये असंच काम असणारच म्हणत ते जिद्दीने करत राहिले. पण जशीजशी वर्षे जात राहिली तसे त्यांना कठीण वाटू लागले. मुलाचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत कसंही करून चालवत राहिले पाहिजे, मग तर त्याला चांगले काम मिळेलच आणि ते रिटायर होऊ शकतील या विचारांनी ते काम करत राहिले.

सौमित्रला इंजिनियरिंगला खूप चांगले मार्कस् मिळाले आणि एमबीएला प्रवेशही मिळाला. त्याच्या शिक्षणाचा खर्च खूप होता पण आता फक्त दोन वर्षांचाच प्रश्न, म्हणत त्या नवराबायकोंनी मुलाला पाठिंबा दिला. पण त्याच्या दुसऱ्या सेमिस्टरमध्येच अच्युतरावांना अर्धांगवायूचा जबरदस्त झटका आला.

ते घरच पुरतं कोलमडून गेलं. हॉस्पिटलच्या दीर्घ वास्तव्यामुळे सौमित्रच्या अभ्यासावर परिणाम झाला. वनिताबाई हबकूनच गेल्या, त्यांना एवढी दगदग आणि ताण सहन करणे कठीण होत होते. आजारपणाचा विमा असला तरी अतिरिक्त खर्च इतका.... हॉस्पिटलातून घरी आणल्यावरही फिजिओथेरपिस्ट, मालीश करणारा, सगळ्यांचे खर्च. हळूहळू सुधारणा होत होती. ते पूर्णतया अंथरूणाला खिळले नव्हते, पण सतत कोणी ना कोणी सोबत असणे जरूर होते.

पूर्ण घराचच एक नवीन रूटीन सेट होईपर्यंत त्यांच्या लक्षात आले कि त्या घराला कमाईची सक्त गरज होती. सौमित्रने आपलं एमबीएचं स्वप्न सोडून देऊन नोकरी करण्याचं ठरवलं. पण वनिताबाईंनी ऐकून घ्यायलाच नकार दिला. "कोणाला मिळत नाही पण तुला ॲडमिशन मिळाली आहे, ही दोन वर्ष कसंही करून पूर्ण करायचीच. मी पुन्हा कॉलेजात शिकविन, त्यात काय आहे?" आणि म्हणून त्यांनी अर्ज दिला......

परतायला उशीर झाला त्यामुळे सौमित्र काळजी करत होता. बाईंनी आधी पतीचं औषध, खाणंपिणं पाहिलं मग सौमित्रसाठी कॉफी करून त्याला बसून झालेलं सगळं सांगितलं. संजनाबरोबर झालेल्या मागच्या घडामोडी ऐकल्यावर तर त्याने साफच सांगितले, “तिच्या ऑफरचा प्रश्नच येत नाही मम्मी. ती बदला घेण्यासाठी हे करतेय ते दिसतच आहे. तो विचारच सोडून दे. तू दुसऱ्या कॉलेजात का नाही ट्राय करत? किंवा घरीच खाजगी कोचिंग घे ना....”

“माझं रिटायरमेंटचं वय होऊन गेलय. नवीन जागेत, कोण अनोळखी माणसं मला काम देतील? हे माझंच कॉलेज म्हणून प्रयत्न केला,” त्या समजावत म्हणाल्या, “आणि घरी कोचिंग शक्य नाही. पपांना त्रास होईल. अगदी त्यांच्या घरचीच माणसं आली तरी ते इतके अवघडून जातात. अश्या स्थितीत कोणी पाहिलेलही त्यांना नको वाटतं रे....”

“मी तुला आधीच सांगितलं होतं, तू काही करायलाच जाऊ नकोस, मी पाहातो काय नि कसं करायचं ते...” तो जिद्दीने बोलला. “नाही हं, ते मात्र अजिबात चालणार नाही,” त्या निक्षून म्हणाल्या, “तू फक्त अभ्यासावरच लक्ष द्यायचं. अरे, दीड वर्षाचाच तर प्रश्न आहे. मी विचार करते.....” मग जरा थांबून म्हणाल्या, “तसा विचार तरी काय करायचा? मला थोडीच कायमचं तिच्या कंपनीत काम करायचय? वर्ष-दीड वर्ष कसही काढता येईल. हो, सूड घ्यायचाच असेल तिला, पण मी ही सावध राहिले, तर......”

अच्युतरावांना त्रास होऊ नये म्हणून त्यांच्यापुढे ते दोघं बोलत नसत, पण सौमित्रने त्यांना परावृत्त करण्याचा खूप प्रयत्न केला. मिसनी तिच्यावर ॲक्शन घेतली होती म्हणून ती त्यांना फसवून कुठल्यातरी प्रकरणात गोवेल, आणि न जाणो

त्यातून पुढे किती नि काय निघत राहील, याची त्याला भीती होती. पण तसं पाहिलं तर त्यांच्यापुढे फारसे पर्याय शिल्लक नव्हते. पैसे कमावायचेच तर संजनाने देऊ केलेली संधी घेणे प्राप्तच होते. त्या सकारात्मकच विचार करत राहिल्या कि कॉर्पोरेट जगात अश्या कोत्या मनोवृत्ती नसतात, तिने कंपनी काही माझ्यावर सूड उगवण्यासाठी सुरु केली नाहीये, तेव्हा तिला फक्त कामाशी मतलब.

मनाचा हिय्या करून वनिताबाईंनी संजनाची कंपनी जॉईन केली. संजनाला तर खूप आनंदच झाला, पण तो पहिलं युध्द जिंकण्याचा आसूरी आनंद असावा असं बाईंना जाणवलं. त्यांना अकाउंट्स विभागात मध्यम पदावर काम देण्यात आलं आणि समजावूनही सांगण्यात आलं. त्यांना ते काही फारसं कठीण वाटलं नाही, तरी खूप सावधतेने त्या ते करत राहिल्या.

पण संजनाने दुसराच पवित्रा घेतला. बाईंना प्रत्येक कामाचं रिपोर्टिंग तिला करावं लागे आणि ऑर्डर्सही तिच्याकडून घ्याव्या लागत. हे जरा विचित्र होतं, कारण सीईओला रिपोर्ट करण्यास त्या काही उच्चतम पदावर नव्हत्या. ती त्यांना कंपनीच्या बऱ्याच मिटिंग्जमध्ये उपस्थित राहायला सांगू लागली, त्यांची तिथे गरज नसतांनाही. मग कामात काहीनाकाही प्रश्न काढून सर्वांसमोर धारेवर धरी. केवळ त्यांचा पाणउतारा करण्यासाठी ती हे करत होती हे बाईंच्याही लक्षात आले. कधी मध्येच त्यांच्या डिपार्टमेंटमध्ये येऊन सर्वांसमोर त्यांच्यावर खवचट ताशेरे झोडू लागली. कर्मचाऱ्यांचं मत तिच्याबद्दल काही फारसं चांगलं नव्हतं, तरी अशी वागणूक त्यांनी कधी पाहिली नव्हती, आणि ते ही तिच्या आईच्या वयाच्या बाईंबरोबर, हे सर्वांनाच खटके.

वनिताबाई तोंड दाबून हे सर्व सहन करत होत्या. त्या याबाबत घरी काहीच सांगत नव्हत्या. अच्युतरावांना तर त्या किती मजेत नोकरी करत होत्या असेच भासवत होत्या. त्यांच्या मालीशवाल्याच जास्त पैसे वाढवून दिवसभरासाठी त्यांच्या सोबतीला ठेवले होते, तेव्हा ती काळजी नव्हती. सौमित्रला त्या फारसं काहीच सांगत नसतं, पण त्याला आईच्या डोळ्यातील वेदना उमगत होती. तो जिद्दीने अभ्यासापाठी लागला.

यासर्वांतूनही त्या कामाच्या बाबतीत मात्र अतिदक्ष होत्या की पैशाच्या, अकाउंट्सच्या कोणत्याही घोटाळ्यात त्यांना अडकवले जाऊ नये. संजनाचा तसा विचारच नव्हता का त्यांच्या दक्षतेमुळे काही घोटाळे झाले नाहीत, हे त्यांना कळू शकले नाही, पण इतर सर्व बाबतीत मात्र तिने काही कसर सोडली नव्हती. बाईंसाठी ते सर्व अति होत होते, पण मुलाच्या संपत येणाऱ्या शिक्षणाकडे पहात त्या एकएक दिवस लोटत होत्या.

सौमित्रची शेवटची सेमिस्टर सुरू झाली आणि त्यांना थोडासा मानसिक आराम वाटू लागला. स्वतःच्या रक्षणासाठी त्या सावध होत्याच, पण त्यामुळे त्यांना अकाउंट्समध्ये काही गडबड दिसून येऊ लागली. प्रथम त्यांना भीती वाटली की हा त्यांनाच गोवण्याचा सापळा आहे. पण त्यांच्या नेहमीच्या सवयीने जेव्हा त्या अधिकाधिक तपास करू लागल्या तेव्हा त्यांच्या ध्यानी आले की कंपनीतली दोन माणसे अतिशय हुशारीने कंपनीला लुबाडत होती.

एकदा बाईंच्या मनात आले, आपल्याला काय करायचंय? आपण तर थोड्या दिवसातच सोडून जाणार. आणि संजनाचं जर कुणी नुकसान करत असेल, तर बरचं झालं, तिला अशीच अद्दल घडायला हवी. पण काही दिवसांनी हा विचार

त्यांना अस्वस्थ करू लागला. संजना कशीही असो, त्यांनी ह्या कंपनीचं मीठ खाल्लं होतं. एकदा लक्षात आल्यावर चुकीचं काम करणाऱ्यांना मोकळं सुटू देता कामा नये.

त्यांनी त्यांच्या रेकॉर्डसमधूनच पूर्ण प्रकाराचा छडा लावला. ते दोघे अजिबात संशयास्पद किंवा आपापसात खुसपुस करणारे असे नव्हते. खरंतर, ऑफिसात ते फारसे एकमेकांच्या संपर्कातही दिसत नसत, तरी ते मिळूनच काम करत होते. बाईंनी पूर्ण एक फाईलच तयार केली.

सौमित्रला शेवटची परिक्षा होण्याआधीच मोठ्या मल्टीनॅशनल्समधून बोलावणी आली होती नि परिक्षा संपताच, निकालाच्या आधीच त्याला रुजू होण्याची ऑफर मिळाली. बाई सुटकेचा निःश्वास टाकत राजीनामा घेऊन संजनाच्या केबीनमध्ये गेल्या. संजनाने त्यावर फारशी काही प्रतिक्रिया दाखविली नाही. “मुलाचे शिक्षण संपताच तुम्ही नोकरी सोडणार हे अपेक्षितच होतं. शिवाय, तुम्हालाही – या वयातही – इतर कंपन्यांतून बोलावणी येत आहेत, खरंय ना?” वनिताबाईंनी फक्त मान डोलावली, पण विषय बदलत त्या म्हणाल्या, “मला काही बोलायचं होतं….”

‘आता अजून काय़?’ अश्या अर्थाने संजनाने काही न बोलता भुवया उंचावल्या. बहुधा त्यांना दिल्या गेलेल्या वागणूकीवरून या लेक्चर देणार, अशी तिची कल्पना होती. “माझा तसा या गोष्टीशी संबंध नाही, आता कंपनीशीच संबंध नाही, तेव्हा माहीत नाही मी हे करावे की नाही… तुम्ही म्हणाल की माझी जित्याची खोड काही जात नाही, पण जे नजरेस आले ते तुमच्या निदर्शनास आणून द्यावे….” म्हणत त्यांनी त्यांचा ऑफिसचा लॅपटॉप उघडून संजनासमोर ठेवला.

जसजसे संजना वाचत गेली तिच्या चेहऱ्याचा रंग बदलत गेला, आणि शेवटी तर ती चवताळून उठली, “मी… मी या दोघांना तसं सोडणार नाही. पोलीसकेस करेन, अद्दल घडविल्याशिवाय राहणार नाही. प्रश्न फक्त पैशांचा नाहीये, जिथे काम करतात तिथे हे अशी दगाबाजी कशी करू शकतात? त्यांना धडा शिकवला तरच बाकीचे अशी कामाच्या जागी धोकेबाजी करण्याआधी दहादा विचार करतील …”

वनिताबाई केवळ या गोष्टीबद्दल सांगून निघणार होत्या. पण तिचा तडफडाट पाहून त्यांना राहवेना, “हो, आपण जी कंपनी, जी संस्था आपली समजतो, तिच्याशी कुणी अशी प्रतारणा केली तर संताप होतोच, नाही का? मी ही कॉलेजला आपली संस्था, आपलं मानत होते……” संजना त्यांच्याकडे पहातच राहिली. त्या शांतपणे उठून निघाल्या.

दुसऱ्या दिवशी संजनाला आपल्या दारात पाहून बाईंना धक्काच बसला. घराचा अवतार असा...पण तिचं लक्ष कुठेच नव्हतं, तिने आत येऊन सरळ बाईंच्या पायावर डोकं ठेवलं. “शक्य असेल तर मला माफ करा. तुम्ही मला शरमिंद केलंत. मी..मी इतकी वाईट वागले तुमच्याशी, तरी तुम्ही आपल्या कामाशी, कंपनीशी प्रतारणा केली नाही. तुम्ही मुद्दाम गप्प राहून मला, कंपनीला नुकसान करू शकला असता, पण तुम्ही चुका न सहन करण्याच्या आपल्या तत्त्वाशी आणि कंपनीशीही प्रामाणिक राहिलात. स्वतःवर पाळी आल्यानंतर मला कळलं तुम्हाला का माझी चीड आली होती. माफ करा.. पण परत या, मला गरज आहे तुमची. हवंतर घरून काम करा, मी सर्व सोयी पुरवीन, पण माझ्यापाठीशी उभ्या रहा…..”

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सोळावे वर्ष.

# सविता शेट्टी यांचे हे तिसरे पुस्तक.

सविता शेट्टी यांच्या कथा मानवी जीवनातील आणि विशेषतः स्त्रियांच्या आयुष्याच्या संबंधांतील नाजूक गुंतागुंत अधोरेखित करणाऱ्या असतात. प्रत्येक स्त्रीची कथा वेगळी असते. जगातील कोट्यवधी आयांची मने मात्र एकसारखी असतात. त्यामुळे सविताजींच्या कथा या वाचकाच्या मनाला भिडतात. त्यातले नाट्य त्या यशस्वीपणे रंगवतात. आणि त्यातले स्त्रीहृदयाला भिडणारे काव्य प्रत्येक वाचकाच्या मनापर्यंत पोहोचते.

सविताजींसारख्या ज्येष्ठ साहित्यिका आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१६), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(११), डॉ. नितीन मोरे (४४), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (१०), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(४६), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी

धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (३), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(७) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१२), श्याम कुलकर्णी(१४), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (६), प्रवीण दवणे, आर्या जोशी, सरोज सहस्रबुद्धे (१०), सविता शेट्टी (३)असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।